

# रंग बरसे

## अद्भुत रंगसंस्कृती

**लेखक : अरुण फडके**



ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# रंग बरसे – अद्भुत रंगसंस्कृति

लेखक

## अरुण फडके

# रंग बरसे – अद्भुत रंगसंस्कृति

## लेखक... अरुण फडके

पत्ता- अरुण फडके, १९, अमिता सोसायटी, चवथा मजला, कान्होजी आंग्रे मार्ग, कोलडोंगरी, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०००६९.
M: 7400173637M: ७४००१७३६३७,
arunphadke7@gmail.com

मुखपृष्ठ: श्री शैलेश तेंडोलकर

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com
esahity@gmail.com
Whatsapp- 9987737237
eSahity Pratishthan
eleventh floor
eternity
eastern express highway
Thane. 400604

**प्रकाशन : २५ डिसेंबर २०२१**
**(मार्गशीर्ष व. अष्टमी शके १९४३)**

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

**हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.**

# अरुण फडके

## लेखन आणि लेखक परिचय:



- गेली ३५ वर्षे इमारत दुरूस्ती आणि **Heritage Structure Rehabilitation & Restoration** या व्यवसाय - या विषयातील अनेक यंत्र-तंत्रांचा विशेषज्ञ.
- विलेपार्ल्यातील गेल्या ९० वर्षातील हौशी आणि बालनाट्य चळवळ, प्रायोगिक - व्यवसायिक नाट्य चळवळ याचा इतिहास आणि विलेपार्ल्यातील रंगकर्मी यांचा परीचय करून देणाऱ्या पुस्तकाचे संकलन-लेखन सुरु आहे.
- **फ्रीमेसनरी (Freemasonry)** या प्राचीन जागतिक संघटनेचे सदस्य आणि संघटनेच्या भारतातील इतिहासाचे अभ्यासक, **एक इंटरनॅशनल कॉफी टेबल बुक प्रकाशित.**

- **विस्मृतीत गेलेल्या मराठी म्हणी - वाक्प्रचार** याचे अभ्यासक. पुस्तक लवकरच प्रकाशित होईल.
- **सिंबॉल** – **सिंबॉलिझम** — **ॲलिगरी, अर्थात रूपकशास्त्र** – **प्रतीकशास्त्र -- चिन्ह** – **चिन्हसंकेत - चिन्हार्थ** या विषयाचे अभ्यासक. **चिह्न निमित्त** – **निमित्त चिह्न** या पुस्तकाचे लेखन पूर्ण. पुस्तक लवकरच प्रकाशित होईल.
- **विलेपारल्यातील बलुतेदार, भाग १** आणि **भाग २** अशी संकलित २४ लेखांची दोन ईपुस्तके प्रकाशित झाली आहेत.
- **नव दुर्गा प्राचीन संकल्पना** – **रुपके** आणि **मातृदेवता- प्राचीन भारतीय संकल्पना आणि रुपके,** ही स्त्री देवतांच्या प्रतीके आणि रुपके या अभ्यासावर आधारित दोन ईपुस्तके ईसाहित्य प्रतिष्ठानतर्फे प्रकाशित झाली आहेत.
- **आता मी पारल्यात रहात नाही** हे ईपुस्तक ११ डिसेंबर २०२१ या दिवशी ईसाहित्य प्रतिष्ठानतर्फे प्रकाशित झाले.
- **रंग बरसे** – **अद्भुत रंगसंस्कृति** हे रंग या विषयाच्या सांस्कृतिक इतिहासाच्या अभ्यासावर आधारित ईपुस्तक, २५ डिसेंबर २०२१ या दिवशी ईसाहित्य प्रतिष्ठानतर्फे प्रकाशित होत आहे.

**--००--**

# रंग बरसे

# अनुक्रमणिका


| क्र | शीर्षक | पान |
|---|---|---|
| १ | लेखकाचे मनोगत | |
| २ | विषय परिचय | |
| ३ | प्रस्तावना | |
| ४ | अर्पणपत्रिका | |
| ५ | रंग लाल | |
| ६ | रंग निळा | |
| ७ | रंग पिवळा | |
| ८ | रंग हिरवा | |
| ९ | रंग भगवा | |
| १० | रंग जांभळा | |
| ११ | रंग काळा | |
| १२ | रंग पांढरा | |
| १३ | रंग सुसंगती | |

# लेखकाचे मनोगत



सत्तरीच्या उंबरठ्यावर उभा असतांना, आज मागे वळून पहातो तेंव्हा मी जगलेला माझा प्रत्येक क्षण – प्रत्येक दिवस – प्रत्येक महिना – प्रत्येक वर्ष किती रंगतदार होते त्याची अनुभूति आजहि थरारक वाटते आहे. शाळा संपून महाविद्यालयातील प्रवेशाबरोबरच, विलेपारल्यातील गॉसिप ग्रुप या



प्रायोगिक रंगभूमीवर उत्साहाने काम करणाऱ्या तरुणाईच्या चळवळीत मी सहभागी झालो. इथेच चेहेऱ्याला प्रथम रंग लागला होता.

पदवी परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर लगेचच, दोन समविचारी मित्रांसह, प्रिंटिंग प्रेसच्या व्यवसायातील उमेदवारी सुरू झाली. वर्ष १९७६ – ८० या काळांत प्रिंटिंगची कामे



प्रामुख्याने ट्रेडल मशीनवर होत असंत. दोन – तीन खिळे जुळारी आणि दोन ट्रेडल मशीन कामगार यांच्याबरोबर काम करतांना प्रिंटिंग इंकचा परिचय झाला. लग्नपत्रिका छापताना अर्थातच ट्रेडल मशीन – ऑफसेट – स्क्रीन प्रिंटिंग अशा वेगवेगळ्या माध्यमातील रंगांच्या वापराच्या अनुभवात वृद्धी होत राहिली.

वर्ष १९८० – ८२ या दरम्यात वैयक्तिक जीवनात एक अनपेक्षित वादळ आले आणि प्रिंटिंग प्रेसच्या व्यवसायातील भान सुटले आणि मी दिशाहीन झालो. त्या काळांत, माझ्या आई-वडिलांसाह माझी बहीण उषाताई अर्थात सौ शीला आणि तिचे यजमान श्री शरद पटवर्धन यांनी मला आत्मविश्वास दिला – माझी उपजत गुणवत्ता हेरली – मला ऊर्जा आणि उत्साह दिला. श्री शरद पटवर्धन यांनी मला त्यांच्या व्यवसायांत सामील करून घेतले. घसरलेली माझी प्रगतीची गाडी पुन्हा रुळावार आली.

रहात्या घरांचे आतील रंगकाम आणि इमारतींचे बाहेरून रंगकाम असे त्या व्यवसायाचे प्राथमिक स्वरूप होते. श्री पटवर्धन त्यावेळी एका औद्योगिक रंग बनवणाऱ्या कंपनीत सेल्स डिपार्टमेंट मधे काम करत असंत. महत्वाकांक्षा आणि दूरदृष्टि असलेल्या श्री पटवर्धन यांनी काही काळातच रंगनिर्मितीचा स्वतःचा कारखाना स्थापन केला. पवईची लार्सन अँड टुब्रो – रबाळे येथील सीमेन्स – इंडियन एअरलाईन्स हँगर अशी मोठ्या उद्योगांच्या रंग कामाची कॉंट्रॅक्ट घेत घेत रंगाच्या व्यवसायाची प्रगती झाली होती.

कालांतराने इमारत दुरुस्ती आणि रंगकामाच्या माझ्या स्वतंत्र व्यवसायाची मी सुरुवात केली. या घटनाक्रमात योगायोग असा की या प्रत्येक अनुभवात, या रंगांची साथ कायम राहिली आणि त्या विषयाची ओढ आणि उत्सुकता दिवसागणिक वाढत राहिली. साधरण वर्ष २००५ मधे माझ्या आईकडून मिळालेल्या निसर्गदत्त प्रेरणेने माझा प्रतीकशास्त्र – रुपकशास्त्र – चिह्नशास्त्र अशा



विषयाचा अभ्यास सुरू झाला. रंग आणि रंगसंस्कृती हे या अभ्यासातील महत्वाचा घटक होते.

वर्ष २०१५ पासून माझे निवडक पुस्तकांचे वाचन आणि चाळीस वर्षांचा प्रत्यक्ष अनुभव यातून रंग, रंगांचे व्यक्तिमत्व, विविध माध्यमातील रंगांचा वापर, त्यांची कारण मीमांसा आणि अर्थातच जगभरातील अद्भुत रंगसंस्कृतीचा परिचय मला होत राहिला. वर्ष २०१९ च्या जीवनज्योत या दिवाळी अंकात संस्कृति या विषयवस्तूवर तुझा लेख हवा आहे या माझ्या स्नेही डॉ रश्मि फडणवीस यांच्या विनंतीवरून जगभरातील रंगसंस्कृति  असा दीर्घ लेख संपन्न झाला. त्या लेखाचा विस्तार होत राहिला आणि रंग बरसे – अद्भुत रंगसंस्कृति या ईपुस्तकांतील एकूण आठ रंगांवर आठ लेख सिद्ध झाले.

मी चित्रकार नाही आणि मी रंगांची निर्मितीही करत नाही. मात्र छंद आणि व्यवसायातील प्रत्येक माध्यमात, मी रंगांच्या सानिध्यात राहून रोज रंगयात्री झालो. आनंद – उत्साह – ऊर्जा – निराशा – जिद्द – निग्रह – समाधान – असूया – श्रद्धा – भक्ति – करुणा – वात्सल्य – स्नेह असे रंगांचे व्यक्तिमत्व आणि गुणवैशिष्ट्य यांत लौकिकदृष्ट्या अनुभवता येणारे असंख्य भाव प्रत्यक्ष जीवनात परिस्थितीनुसार अनुभवले. या सर्व पातळ्यांवर जगलेला माझा प्रत्येक क्षण रंगीत झाला आहे. या ईपुस्तकाच्या निर्मितीमागे, हीच भावना आणि धारणा माझी ऊर्जा आहे.


माझे शाळासोबती श्री विनोद जोशी रंगतंत्रज्ञ आहेत आणि रंगनिर्मितीच्या व्यवसायातील एक यशस्वी उद्योजक आहेत. माझ्यासारखेच ते

रंगधर्मी आहेत. **रंग बरसे – अद्भुत रंगसंस्कृति** या पुस्तकासाठी प्रस्तावना लिहावी ही माझी विनंती मान्य करून त्यांनी या ईपुस्तकाच्या विषयवस्तूवर सुंदरसे मखर बांधले आहे. रंगतंत्रज्ञ – रंगधर्मी श्री विनोद जोशींना शतशत धन्यवाद..!

माझे हे सहावे ईपुस्तक. या पुस्तकासह प्रत्येक पुस्तकाचे मुखपृष्ठ चित्रांकीत करतांना, माझे स्नेही श्री शैलेश तेंडोलकर या अनुभवी ग्राफीक आर्टिस्टने, पुस्तकांतील रंग या विषयवस्तूचा गाभा आणि सूक्ष्मार्थ कौशल्याने अंकित केला आहे. त्यांना अनेकानेक धन्यवाद..!

ईसाहित्य प्रतिष्ठानचे श्री सुनीळ सामंत आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी, नेहेमीच्या तत्परतेने आणि उत्साहाने या ईपुस्तकाला आकर्षक करण्यासाठी प्रेमाने, उत्साहाने निर्मिती कौशल्याचे रंग भरले आहेत. या सर्वांना मनःपूर्वक धन्यवाद..!!

अरुण फडके,
विलेपारले, मुंबई,
१ डिसेंबर, २०२१.
--००--



# विषय परिचय

खरं म्हणजे आपण सारे रोजच रंगभरल्या रंगीत जगात वावरत असतो. क्षणभर कल्पना करा की आपल्या भोवताली एकही रंग नाही..!..मग असे जग कसे असेल..?!..आज आपल्याकडे पेस्टल यलो आहे, चमकता यलो आहे, लेमन यलो आहे आणि यलो ऑकर सुद्धा आहे .. फक्त पिवळ्या रंगाच्याच आता आपल्याकडे असंख्य छटा आहेत. असे विविध रंग ओळखायचे – त्यांना निश्चित संकेतमूल्य द्यायचे आणि आपल्या चित्रात वापरायचे, हे शिशु – कुमार – तरुण – वयस्क नागरिक आणि अनुभवी चित्रकार या सर्वांसाठी परम आनंदाचे विधान असते. आपण सर्वांनी अनुभवलेले बालपणीचे काही क्षण आठवा..!!.. बालमंदिरातील छोट्या मुलांच्या चित्रात अशी गंमत असते. त्यांच्या चित्रातील माणसांच्या त्वचेचा रंग–मातीचा, पाण्याचा आणि आकाशाचा रंग–फुगे आणि कपड्यांचा रंग असा का....!?!..या प्रश्नाला त्याच्याकडे निश्चित उत्तर असते. त्याच्या चित्रातल्या दिसणाऱ्या प्रत्येक रंगाला त्यांनी एक संकेतमूल्य दिलेले असते.

रंग – त्यांची निर्मिती – वापर ही मानवी इतिहासातील सांस्कृतिक उत्क्रांती आणि प्रगती आहे. याला समाजाची किंवा सामाजिक प्रगती असे संबोधन वापरता येणार नाही. रंगांच्या प्राचीन इतिहासाचा अभ्यास करतांना, याची स्पष्ट जाणीव होते. रंग, त्यांची निर्मिती, वापर याचा ज्ञात इतिहास, पासष्ठ हजार वर्षांचा आहे. पांढरी चुनखडी – लाल आणि पिवळ्या रंगाची माती – जनावरांची चरबी – कोळसा अशा वस्तूंपासून आदिम मानवाने अगदी प्राथमिक रंगांची निर्मिती केली होती. काळा – पांढरा – लाल – पिवळा – ब्राऊन असे

पांच रंग बनवण्यासाठी, हे आदिम तंत्रज्ञान वापरले गेले होते. या पासष्ठ हजार वर्षांच्या प्रगतीमधे, अनेक नवे रंग बनविण्याचे तंत्रज्ञान, क्रमाक्रमाने विकसित होत राहिले. नंतरच्या प्रगतीमधे, वनस्पति आणि खनिजे यांचा वापर रंग निर्मिती साठी होऊ लागला. Renaissance काळांत म्हणजे १४ व्या – १५ व्या आणि १६ व्या शतकांतिल साहित्य आणि कलेच्या परिवर्तन काळांत आणि त्या नंतर, चित्रकारांच्या वेगवेगळ्या शैली प्रगत होण्याच्या Impressionism या कालखंडात, अनेक रंगसंशोधकांनी या रंग निर्मिती तंत्रज्ञान – विज्ञान यातील नव्या संकल्पना आणि विकासाचा इतिहास लिहिला आहे.



^ चित्र क्र १



^ चित्र क्र २



^ चित्र क्र ३

रंगांच्या दुनियेत **लाल – पिवळा – निळा** हे चित्र क्र १ मधील तीन मुलभूत आणि प्राथमिक रंग आहेत. या तीन रंगांना प्राथमिक, मूलभूत किंवा वास्तविक अशी संबोधने वापरली जातात यांचे कारण हे तीन रंग अन्य कुठल्याही रंगांच्या मिश्रणाने बनत नाहीत अथवा बनवता येत नाहीत. मात्र या तीन रंगांच्या मिश्रणातून चित्र क्र २ मधील दुसऱ्या गटातल्या आणि चित्र क्र ३ मधील तिसऱ्या गटातल्या रंग छटा बनवल्या जातात.

या पुस्तकांत, चित्र क्रमांक १ मधील लाल – निळा – पिवळा या प्राथमिक रंगांचा सांस्कृतिक परिचय प्रथम लिहिला आहे. या बरोबरच, लाल+पिवळा या दोन प्राथमिक रंगांपासून बनणारा नारिंगी – केशरी – भगवा अर्थात ऑरेंज, लाल+निळा या दोन प्राथमिक रंगांपासून बनणारा जांभळा –

बैंगनी – व्हायोलेट – पर्पल – लायलॅक आणि निळा+पिवळा या दोन प्राथमिक रंगांपासून बनणारा हिरवा – शेवाळी – ग्रीन अशा चित्र क्रमांक दोन मधील दुसऱ्या गटातील रंगांच्या तीन छटांचा सांस्कृतिक परिचय लिहिला आहे. याचे कारण आपल्या दैनंदिन जीवनात दुसऱ्या गटातील भगवा – जांभळा – हिरवा या तीन उपरंगांचा प्रभाव जास्त आहे. अर्थात पांढरा आणि काळा या दोन रंगांचे परिचय आहेतच. हे सर्व वाचकांना, प्रत्येक रंगाच्या परिचय लेखांत विस्ताराने वाचता येईल.

सामान्यतः Harmony हा शब्द, आपण स्वर आणि संगीत या संदर्भात, स्वरांची आणि वाद्यमेळाची अनुरूपता आणि स्वरैक्य याचे वर्णन करताना वापरतो. अगदी तसेच, दोन अनुरूप रंगतत्वांचा मिलाप आणि त्यातून दृश्यस्वरूपांत निर्माण होणारा सुसंवाद हा विषय माझ्या आवडीचा आणि अभ्यासाचा विषय कधी झाला ते सांगता येणार नाही. एखादे चित्र – एखादी आकर्षक जाहिरात – एखादी देखणी इमारत – एखाद्या घराच्या आतील सजावट आणि नवरात्रीत तालबद्ध गरबा खेळणाऱ्या तरुणींची रंगीबेरंगी चुनरी – चणीया – चोळीचे परिधाने अशा प्रत्येक दृश्यात आपल्याला या Color Harmony चा अनुभव मिळतो. या पुस्तकांतील **रंगसंगती** या शेवटच्या लेखांत, वाचकांना या ज्ञानशाखेचा विस्ताराने परिचय नक्की होईल.

आजच्या काळांत सर्वात लोकप्रिय असलेल्या यातिल निळया रंगाचा इतिहास फारच रंजक आहे. उत्क्रांती काळांत मानवाला फक्त काळा – पांढरा हे दोनच रंग आणि त्यांच्या राखाडी रंगाच्या छटा दिसत असंत. कालांतराने प्रथम त्याला लाल – पिवळा – हिरवा या रंगांचे दृष्टीज्ञान झाले. यांत निळा रंग वेगळा

आहे हे त्याला फार उशिराने ओळखता येऊ लागले. रंगांच्या इतिहासकारांनी हे सप्रमाण सिद्ध करण्यासाठी, भाषा व्युत्पत्तीशास्त्राचे अनेक दाखले दिले आहेत. ग्रीक – चीनी – जपानी आणि हिब्रू या चार प्राचीन भाषांमध्ये निळा रंग असा शब्द नाही किंवा त्याला समानार्थी शब्दही नाही. त्या काळांत निळी छटा ही हिरव्या रंगातील एक छटा आहे असे मानले गेले होते. कोरियन – व्हीएट्नामी – थाई – कुरडिश – झुलू – हिंबा या भाषांमध्ये आजही निळा रंग हा शब्द नाही. निळया रंगाचा उल्लेख करतांना Green-Blue Blurring असा शब्द प्रयोग वापरला जातो. होमर या ग्रीक कवीचा जन्म  ख्रिस्तपूर्व वर्ष ७५० मधे झाला. ओडिसी या त्याच्या जगप्रसिद्ध कवितेत, निळया सागराचे वर्णन करताना त्याने wine dark sea असा शब्दप्रयोग वापरला आहे. And what if one of the Gods wreck me out on the wine-dark sea…?

रंगांच्या अंतरंगात शिरल्यावर या संदर्भातल्या पारंपरिक लोकश्रुती – लोकोक्ती, विशिष्ट रंगांच्या वापराचे हेतू – उद्देश, जगभरातील लोकजीवनातील आणि लोकसंस्कृतीतिल रंगांचे विविध अर्थ आणि संदर्भ, निसर्ग निर्मित रंग आणि आधुनिक विज्ञानाने झालेले रंगांविषयीचे संशोधन..अशा बरसणाऱ्या रंगांच्या आणि रंगविज्ञानाच्या असंख्य शाखा – उपशाखा आपल्या समोर उलगडत जातात. विविध रंगांचा वेगवेगळया संस्कृतीत बदलत जाणाऱ्या अर्थसंकेतांचा अभ्यास फारच रंजक आहे. वर्ष १७०४ पर्यन्त आकाशातील इन्द्रधनुष्यात पांच रंग आहेत असे मानले गेले होते. एकातएक मिसळलेले असल्यामुळे, तोपर्यंत यातला कुठलाही रंग शुद्ध स्वरूपांत (Pure Colour) हे निश्चित झाले नव्हते. त्यावर्षी आयझॅक न्यूटन याने इंद्रधनुष्यातील त्या पांच रंगात निळा आणि नारिंगी रंगांसह एकूण सात रंग असल्याचा सिद्धांत मांडला

आणि त्या मूळ पांच रंग असण्याच्या समजुतीत परिवर्तन झाले. मात्र न्यूटनला सात या अंकाचे फार आकर्षण होते असा याला एक वेगळा अवैज्ञानिक संदर्भही जोडला गेला आहे.

इंद्रधनुष्याच्या रंगातही फरक असतो, अशी एक नोंद रंगांच्या इतिहासकारांनी केली आहे. या इतिहासकारांनी जेंव्हा रंगांच्या तंत्रज्ञान आणि विज्ञान याच्या पलीकडे जाऊन रंगांच्या सांस्कृतिक प्रगतीचा वेध घेतला त्यावेळी त्यांना यामध्ये लक्षणीय तथ्य असल्याची जाणीव झाली. यामुळेच, नैसर्गिक धारणेपेक्षाही भिन्न संस्कृतींमध्ये, प्रत्येक रंगांची वेगळी संकेतमूल्य स्वीकारली गेली आहेत. वेदकालीन सिंधू समाज प्राचीन प्रगत संस्कृतींमधे, अनेक रंगांचे तर्कसंगत भूमितीय आकार निश्चित केले गेले होते. असे भूमितीय आकार, त्या त्या रंगाच्या व्यक्तिमत्वानुसार, किती विज्ञाननिष्ठ विचाराने आपल्या पूर्वजांनी चित्रांकीत केले आहेत ते विस्मयकारक आहे. प्रत्येक रंगाच्या लेखांत, या भूमितीय चिन्हाचे विस्ताराने वर्णन केले आहे.




^ समभूज द्विमिती / घन चौकोन
लाल रंगाचे प्रतीक



^ वर्तुळ - निळया रंगाचे
भूमितीय प्रतीक

अगदी सहज स्पष्ट होणाऱ्या किंवा कधी जाणीव होऊनसुद्धा अस्पष्ट रहाणाऱ्या अशा अनेक मनोभावना, रंगांच्या सानिध्यात अनुभवाला येतात. एखादा रंग किंवा अनेक रंग एकत्र पाहिल्यानंतर, प्रत्येकाला येणारे असे अनुभव

अगदी नैसर्गिक असतात. मात्र एखादा रंग पाहिल्यानंतर माणसाच्या मनात निर्माण होणाऱ्या अशा भावना, दोन प्राथमिक कारणांमुळे होत असतात. प्रत्येक व्यक्तीमधे असणाऱ्या काही अनुवांशिक नैसर्गिक प्रवृत्तींमुळे काही रंग एकच अर्थ आणि मनोभावना प्रत्येकाच्या मनात निर्माण करतात. या उलट, रंगांतून निर्माण होणाऱ्या भावना आणि अर्थ, एखाद्या प्रदेशातील प्रचलित संस्कृती नुसार बदललेल्या दिसतात. अनेकदा रंगांचे संदर्भ आणि विशिष्ट वापर यामुळे एखादा रंग परस्पर विरोधी भावना आणि अर्थही निर्माण करतो.

व्यक्तीच्या प्रणय भावना आणि लैंगिक उत्तेजना अशा शरीर जाणिवासंदर्भात अनेक रंग वेगवेगळे संकेत देतात. इथे वर्णन केलेले संकेत, संशोधनाने काढलेले काही निष्कर्ष आहेत, याला नियम म्हणता येणार नाही. ते प्रत्येक व्यक्तीला लागू पडतीलच असे नाही. रक्तवर्णी संवेदनशील लाल रंग अनेकांचा आवडता असतो. तणावाच्या परिस्थिति या रंगाच्या दर्शनाने एखाद्याचा रक्तदाब वाढू शकतो. याच्या वापराने आणि दर्शनाने अनेकदा उत्कट आवेगात काही व्यक्तींच्या प्रणय भावना आणि लैंगिक उत्तेजना जागृत होऊन त्याची तीव्रता वाढते. लाल रंगाबरोबरच काळा – ब्राऊन – कॉपर हे रंग आणि रंग छटा लैंगिक सुखाशी जोडले गेले आहेत. रंग मनोवैज्ञानानुसार काळा रंग अधिकार आणि चारुता किंवा अभिजात लावण्य याचा परिचय देतो. मात्र काळा रंग आवडणाऱ्या अनेक व्यक्ति हुकूमशहा वृत्तीच्या असतात. कल्पनासृष्टीत (Fantasies) रममाण होणे यांना आवडते. काही व्यक्ति गुप्त - गोपनीय घटनांनमधे सामील असतात. लैंगिक अपराध करणाऱ्या व्यक्तींना काळा रंग पसंत असतो. या उलट निळा रंग आवडणारे स्त्री अथवा पुरुष शांत स्वभावाचे असले तरी दूरदूरच रहातात. प्रणय भावना उत्तेजित होण्यासाठी यांना वेळ

लागतो. अनेकदा अशा व्यक्तींचे लैंगिक जीवन नीरस असते. पाश्चिमात्य देशांत निळया रंगाच्या छटा आवडणाऱ्या स्त्रीया समलिंगी असतात अथवा समजल्या जातात. असेच  काही पिंक म्हणजे गुलाबी रंग छटा आवडणाऱ्या पुरुषांबद्दल म्हटले आते. हिरवा रंग पसंत करणाऱ्या व्यक्ति प्रेमाने आपल्या कुटुंबाची काळजी घेतात. मात्र अनेकदा प्रणयक्रिडेत अशा व्यक्ति कमजोर असतात. जांभळ्या म्हणजे पर्पल रंगाची खासियत अशी की यांच्याकडे निळया रंगाचे स्थैर्य आणि लाल रंगाची उत्कटता या दोन्ही गुणवत्तांचे संतुलन असते. मात्र यामुळेच कदाचित प्रणयक्रिडेत वंचित राहिल्यामुळे अनेकदा निराशा आणि विफलता पदरी येते.




आपल्या सभोवताली दिसणाऱ्या आणि आपल्यावर निश्चित प्रभाव पाडणाऱ्या प्रत्येक सजीव-निर्जीव, प्रत्येक फळ-भाजीपाला, प्रत्येक खनिज, माती आणि पाणी या सर्वांना प्राप्त झालेले रंग नैसर्गिक आहेत. मात्र कपडे – वाहने – औषधांची वेष्टने – घरे आणि इमारतींच्या बाहेरील आणि आतील भिंतींचे.. ..अशा मानवनिर्मित रोजच्या वापरातील वस्तूंचे दर्शनी रंग, जाणीवपूर्वक अभ्यासाने निवडलेले आहेत. या सर्व रंगांच्या सानिध्यात, आपल्या दैनंदिन जीवनात आपल्या कळत-नकळत मिळणारा भौतिक फायदा कदाचित आपल्याला मोजताही येणार नाही इतका मोठा असतो. रंग आपल्याला ऊर्जा आणि उत्साह देतात – विपुल आनंद देतात – स्वातंत्र्याचा अनुभव देतात – सुसंवाद आणि समरसता देतात – क्रियाशील बनवतात –

कधीतरी विस्मय आणि आश्चर्याची अनुभूति देतात – पार्थिव आणि लौकिक जगाच्या पालिकडला भास निर्माण करतात – मोहक, मनोहर, जादुई जगाची सफर घडवतात – सण-समारंभांच्या क्षणाला द्विगुणित करतात – प्रत्येक क्षण-दिवस नवनूतन बनवतात.





विविध रंगांच्या दर्शनाने किंवा वापराने निर्माण होणाऱ्या भावना – संवेदना आणि संकल्पना या दोन्हीचा अभ्यास म्हणजेच रंगांच्या प्रतीकांचा – रुपकांचा – विविध लोकसंस्कृतीतिल चिह्नसंकेतांचा अभ्यास आहे. मात्र इथे एक भूमिका निश्चितपणे सामजून घ्यायला हवी की या पुस्तकांतील माझा हा अभ्यास, तात्त्विक आणि सैद्धांतिक स्वरूपाचा आहे. (Speculative). जगातील अनेक नामवंत अभ्यासकांनी रंगांच्या अर्थाच्या आणि संकेतमूल्यांच्या संदर्भात भिन्न विचार मांडलेले आहेत.

--○○--





# प्रस्तावना



**- श्री विनोद जोशी**

माझा अभ्यासू शाळा सोबती श्री. अरुण फडके याच्या **रंग बरसे - अद्भूत रंगसंस्कृती** या ई-पुस्तकाला प्रस्तावना लिहिण्याची संधी दिल्याबद्दल अरुणचे मनःपूर्वक आभार. या निमित्ताने अरुण बरोबरच्या पुनर्भेटीचा आनंद मिळाला. त्यासोबतच अर्पण पत्रिकेमध्ये ज्यांचा आदरपूर्वक उल्लेख आहे, त्या पटवर्धन कुटुंबियांच्या पुनर्भेटीचा अद्वितीय आनंदही मिळाला. त्याबद्दलही अरुणचे आभार.

कोणत्याही विषयाचा अभ्यास ही एक साधना असते. रंग या विषयाकडे व्यावसायिक दृष्टीने, अर्थार्जनाचे साधन म्हणून पहाणारी अभ्यासू व्यक्ती, जेव्हा त्या विषयाची सर्वंकष साधना करते, तेव्हा या सर्वज्ञात विषयाचा आवाका किती मोठा आहे, याची जाणीव होते. या जाणिवेतून व प्रदीर्घ अभ्यासातून समजलेले आणि काही अंशी स्फुरलेले, विशुद्ध ज्ञान शब्दबद्ध करण्याचा प्रामाणिक प्रयत्न, संपूर्ण पुस्तकभर सतत जाणवत रहातो. निरपेक्ष वृत्तीने आणि केवळ स्वानंदाकरीता केलेला प्रदीर्घ अभ्यास शब्दबद्ध करण्याचा आनंद जसा लेखकाला मिळतो, त्याच आनंदाचा ज्ञानपूर्ण अनुभव खऱ्याखुऱ्या वाचकालाही जाणवतो.

अशा निखळ आनंदाची देवाण-घेवाण हेच या पुस्तकाचे एक वैशिष्ट्य. प्रचंड अभ्यास करूनही अहंकाराचा दर्पही न जाणवता - अगदी अनाग्रही वृत्तीने

लेखन करण्याचा दुर्मीळ पण आवश्यक गुण अरुणच्या लेखनात मला जाणवला. त्याबद्दल लेखक निश्चितच कौतुकास पात्र आहे.

रंगांचा पासष्ट हजार वर्षांचा इतिहास, विविध संस्कृतीतिल रंगांचे संदर्भ आणि प्राचीन तत्वज्ञानापासून आधुनिक भौतिक शास्त्रापर्यंतचे विविध ज्ञान-शाखेतील रंगांचे संदर्भ, इतक्या छोटयाश्या पुस्तकात लिहिणे हे अत्यंत अवघड काम लेखकाने फार उत्कृष्ठ रीतीने केले आहे. इतर कुठेही ज्ञात नसलेला निळ्या रंगाचा उल्लेख चोवीस हजार वर्षांपूर्वीच्या वैदिक संस्कृतीत असल्याचे समजल्याने खरोखरीच अचंबीत होऊन, आपल्या प्राचीन संस्कृतीचा सार्थ अभिमान वाटतो.

जगभरातील रंगांचे विविध संदर्भ आणि अर्थ नक्कीच जिज्ञासू वाचकाला पुढील अभ्यासासाठी प्रवृत्त करतील. रंगांचा व मनोभावनांचा संबंध आणि संस्कृतीनुसार त्यातून प्रतीत होणारे वैविध्य हे खरोखरच विस्मयजनक आहे. निसर्गाने मुक्तपणे पण विशिष्ठ जाणीवपूर्वक केलेली रंगांची उधळण व ते रंग बहाल करणाऱ्या निसर्ग-निर्मित रसायनांचा आयुर्वेदामध्ये उल्लेख असलेला औषधी उपयोग, हा तर दीर्घकाळ स्वाध्यायाचा विषय नक्कीच होऊ शकेल.

भगवा (ऑरेंज) या रंगाच्या नावाचा भाषा-व्युत्पत्ती शास्त्राच्या साहाय्याने केलेला अभ्यास निश्चितच प्रशंसनीय. खगोल शास्त्राच्या दृष्टिकोनातून रंगांचा अभ्यास किंवा ध्वजांवरील रंगांतून प्रतीत होणारी संस्कृती आणि वैचारिक संकेत, हा ही एक नवीनच अभ्यासाचा विषय नक्कीच होऊ शकेल.

ज्ञानाच्या विविध दालनांतून रंगांचा अभ्यास करत करत शेवटी आपण आध्यात्म आणि तत्त्वज्ञानाच्या उंबरठ्यावर येऊन स्थिरावतो. वारकऱ्यांच्या भक्तियोगात अग्रेसर असलेला विठ्ठल-रखुमाईचा काळा-सावळा वर्ण, विष्णुदास नामदेव महाराजांची काळी कृष्णमूर्ती, षटचक्रांशी रंगांचा संबंध आणि कपिल मुनींच्या सांख्य दर्शनातील त्रिगुण संकल्पनेतील राजस वृत्तीचा जांभळा रंग - हे फक्त उदाहरणादाखल केलेले काही उल्लेख.

ज्ञानामृत पाजणाऱ्या पुस्तकांपेक्षा, विविध क्षेत्रातील अधिकाधिक ज्ञान मिळविण्यास प्रवृत्त करणारी पुस्तके जास्त महत्वाची, असे माझे प्रामाणिक मत आहे. विविध ज्ञान-शाखांच्या अभ्यासार्थ आसक्तीचे संकेत देणाऱ्या काश्मिरी केशराप्रमाणेच ज्ञान-भक्तीचे आणि देश-भक्तीचेही बीज प्रत्येक वाचकाच्या मनात, हे पुस्तक रुजवेल, अशी मी अशा करतो.

प्रिय मित्र अरुणच्या अभ्यासपूर्ण पुस्तकाला माझ्या शुभेच्छा. या सुंदर पुस्तकाला प्रस्तावना लिहिण्याची सुसंधी दिल्याबद्दल अरुणचे मनापासून आभार.

विनोद जोशी,

विलेपारले, मुंबई,

६ डिसेंबर, २०२१.

--००--

# अर्पणपत्रिका

ऐन तरुणाईच्या दोन वर्षांच्या एका कालखंडात, अनपेक्षित परिस्थितिमुळे
मी दिशाहीन झालो होतो. माझ्या अनुभवातील तो काळ
रंगहीन होता – निराशेचा होता.
त्या काळांत, माझ्या आई-वडिलांसह माझी बहीण उषाताई - सौ शीला
आणि तिचे यजमान **श्री शरद पटवर्धन** यांनी मला आत्मविश्वास दिला –
माझी उपजत गुणवत्ता हेरली – मला ऊर्जा आणि उत्साह दिला.
श्री शरद पटवर्धन यांनी मला त्यांच्या व्यवसायांत सामील करून घेतले.
घसरलेली माझी प्रगतीची गाडी पुन्हा रुळावार आली.

**श्री शरद पटवर्धन** आज सर्व कुटुंबाचे आधारवड आहेत.
समाजहिताच्या अगणित उपक्रमांचे निरपेक्षवृत्तीने नेतृत्व करणारे श्री पटवर्धन,
एक अनुभवी कुशल मार्गदर्शक आहेत. व्यवहार चातुर्य – लोकसंग्रह –
जनसंपर्क – संवाद कौशल्य आणि अर्थातच रंग या विषयांत
मला गुरुस्थानी आहेत. त्यांच्याप्रति कृतज्ञता व्यक्त करतांना
**रंग बरसे – अद्भुत रंगसंस्कृति** हे ईपुस्तक,
**श्री शरद पटवर्धन यांना**
मी सन्मानपूर्वक अर्पण करतो आहे.
अरुण फडके,
विलेपारले, मुंबई,
१ डिसेंबर, २०२१.

--00--

# चित्ताकर्षक लाल.

जगभरातील भाषा व्युत्पत्तीशास्त्राच्या अभ्यासानुसार, पांढरा आणि काळा या रंगांनंतर लाल (Red) या रंगाचा, त्यांच्या संकेतमूल्यासह, प्रथम उल्लेख तत्कालीन सर्व संस्कृतीतिल भाषांमध्ये झाला होता. आदिम मानवाने Cave Rock Art या मध्यमांतून साधारण चौसष्ट हजार वर्षांपूर्वी (चित्र क्र १७ आणि १८) चितारलेल्या लाल रंगातील या उभ्या आणि आडव्या रेषांचे केलेले रेखांकन आणि चित्रांसाठी हाच रेड ऑकर (चित्र क्र १) लाल रंग वापरला होता. जसा मानव प्रगती करत गेला तसे या लाल रंगासाठी लोहयुक्त खनिजातील Hematite म्हणजे फेरीक ऑक्साइड पासून बनणाऱ्या लाल रंगाचा वापर सुरू झाला. यानंतर Cinnabar या लाल रंगाच्या मरक्यूरी सल्फाईडपासून लाल रंगाची निर्मिती सुरू झाली.



^ चित्र क्र १, रेड ऑकर रंग, गेरू किंवा लोहतत्वयुक्त माती.

शरीर विज्ञानाचा विचार करताना, लाल रंग आपले लक्ष सर्वात प्रथम वेधून घेतो म्हणूनच भर रहदारीच्या चौकात धोका दर्शवणारे षटकोनी फलक,

रहदारी नियंत्रक खांबावरचे दिवे, अग्निशमन यंत्रणा आणि टपाल पेट्या नेहमी लाल रंगात रंगवलेल्या असतात. (चित्र क्र २ ते ५). याच वैशिष्ट्यामुळे छापील जाहिरात, जाहिरात फलक आणि इंटरनेटवरील जाहिरातींमधे या रंगाचा वापर प्रभावीपणे केला जातो. एकाच वेळी प्रेमाची ऊब, उत्कट भावना, क्रोध, क्रौर्य, सत्ता आणि सामर्थ्य, आवेग, प्रेम, आग, रक्त आणि विध्वंसक युध्द अशा पराकोटीच्या विरोधी भावना आणि अर्थ सूचित करणारा हा लाल रंग. हाच लाल रंग; वैभव, ऐश्वर्य, भव्यता, राजवंश, युद्धातील विजय, सफलता असे संदर्भ सूचित करतानाच हिंसक आणि रोमांचक अशा अन्योक्त तीव्र भावनांचे संकेत देत असतो. अशा लाल रंगामुळे निर्माण होणाऱ्या मनोभावना काही निश्चित असे शारीरिक बदल घडवून आणत असतात. विशिष्ट प्रसंगात, चिंता – काळजी – उत्सुकता वाढल्यामुळे  एखाद्या व्यक्तीचा रक्तदाब वाढतो, कधी नाडीचे ठोकेही जलद होतात.







^ चित्र क्र २ लाल पोस्ट बॉक्स

^ चित्र क्र ३ अग्निशमन गाडी






^ चित्र क्र ४ सांकेतिक हृदय

^ चित्र क्र ५ वाहतूक नियंत्रक

काही हजार वर्षांपूर्वी लाल रंग शक्तीचे आणि पुरुषत्वाचे प्रतीक मानला गेला होता. रंगाच्या या संकेतांत आज परिवर्तन झाले आहे. एकोणिसाव्या शतकांत आणि विसाव्या शतकाच्या सुरुवातीला पिंक किंवा गुलाबी ही लाल रंगाची फिकट छटा, छोट्या मुलांसाठी त्यांच्यातिल बाल्यावस्थेतील पुरुषत्वाची सूचक होती. लहान मुलींच्या हलक्या निळया रंगातील कपड्यांचा संकेत, व्हर्जिन मेरीच्या निळया शालीशी जोडला गेला होता (चित्र क्र ७). आज आपण पिंक ही लाल रंगाची फिकट छटा, स्त्रीत्वाचे प्रतीक म्हणून स्वीकारले आहे. हलका निळा रंग पुरुषत्वाशी जोडला गेला आहे. वेस्टर्न देमारपटातील कणखर - राकट - धाडसी टेक्सन काऊबॉयची भूमिका रंगवणाऱ्या जॉन वेन याच्या शर्टचा रंग त्या काळांतिल अनेक चित्रपटात पिंक होता. (चित्र क्र ६). या एकाच उदाहरणावरून माझा वरील मुद्दा वाचकांना नक्कीच पटेल.



^ चित्र क्र ६ जॉन वेनचा पिंक शर्ट



^ चित्र क्र ७ Virgin in Prayer, १६४० - ५०, लंडन म्युझियम

वर्ष १९१८ मधे ब्रिटिश लेडीज होम जर्नल या त्याकाळातील महिलांच्या लोकप्रिय मासिकात या गुलाबी–पिंक रंगाविषयी असा उल्लेख केला गेला होता.. .. The generally accepted rule is Pink for the Boy

and Blue for the Girl. The reason is that Pink being a more decided stronger color, is more suitable for the boy. वर्ष १९५० मधे, अमेरिकेतील जाहिरात तंत्र इतके प्रगत होते की एका आक्रमक जाहिरात मोहिमेने, या दोन्ही रंग छटांचे अर्थसंकेत बदलून टाकले होते.

प्रखर – तीव्र – तेजस्वी असा लाल रंग पूर्ण अपारदर्शक आहे कारण आपल्या डोळयांची संवेदना त्याला प्रथम पूर्ण शोषून घेते. माघ आणि फाल्गुन महिन्यात आपल्याला झाडांची पानगळ झालेली दिसते. अनेक झाडांची पाने गळून पडण्याच्या आधी लाल झालेली दिसतात. निसर्गातील हा फार कमी दिसणारा रंग वृद्धत्व, शुष्कता आणि कोरडेपणाचे लक्षण आहे. आपल्या मानसिक आणि बौद्धिक संवेदनांमधे, या लाल रंगामुळे उष्णता – हवेतील उष्मा – आग आणि रक्त याची आठवण होते.



^ चित्र क्र ८ क्रिसमस रेड



^ चित्र क्र ९ व्हॅलेंटाईन डे लाल गुलाब

याच लाल रंगामुळे आपल्याला ख्रिसमस जवळ आल्याची सुचनाही (चित्र क्र ८) मिळते आणि व्हॅलेंटाइन डेला (चित्र क्र ९) प्रेमाचे संदेश देण्यासाठी सर्वांची तारांबळ सुद्धा हाच लाल रंग उडवतो. वस्तुनिष्ठ विचार करणाऱ्याला, लाल रंगाच्या दर्शनाने...एखाद्या आवडत्या व्यक्तीची अथवा आवडीच्या विषयाची – छंदाची  तीव्र - उत्कट ओढ आणि उत्सुकता निर्माण होते. तर एखाद्या

व्यक्तिच्या मनात आवेग – राग – लोभ – क्रोध – क्रौर्य अशा संवेदना आणि भावना तीव्रतेने निर्माण होतात. या झाल्या व्यक्तीच्या मनातील भावना. संपूर्ण समाजमनाच्या भावनांचा विचार केला तर एखाद्या पंथ, धर्म किंवा संघटनेच्या अनुयायांच्या समूहामधे, स्वतःचे संघटीत सामर्थ्य, लाल रंगाच्या झेंडा अथवा बावट्यामुळे प्रखरतेने जाणवते. या बरोबरच आरोग्य – उत्साह – लालसा आणि अन्य समूहापासून भिती अशा संवेदना, याच लाल रंगामुळे जागृत होतात.

हिंदू धर्मप्रणालीतील शाक्तपंथिय धारणेनुसार, शिवतत्व म्हणजे पुरुषतत्व पांढरा रंग धारण करते तर शक्तितत्व म्हणजे स्त्रीतत्व लाल रंग धारण करते. या नवरात्रि उत्सवात बंगाली महिला लाल काठाची पांढरी साडी नेसतात आणि एकमेकींना लाल सिंदूर (कुंकू) लावून आपले सौभाग्य साजरे करतात. विसर्जनाच्या दिवशी पुरुष पांढरे कपडे घालतात. (चित्र क्र १० आणि ११).


<चित्र क्र १०


< चित्र क्र ११

^ बंगाली स्त्रीयांचे आणि पुरूषांचे पारंपरिक परिधान

या प्रतीकांना काही निश्चित विज्ञाननिष्ठ मूल्यसंकेत आहेत. युगुलधर्म मैथुन क्रियेतील पुरुष आणि शक्तितत्वाच्या निर्मितीक्षम विर्याच्या निसर्गदत्त पांढऱ्या रंगावरून, श्वेतबिंदु या नावाने पांढऱ्या रंगाचे रुपक चिह्न शिवतत्वा साठी स्वीकृत झाले. विवाहित ऋतुमती स्त्रीच्या, मासिक चार दिवसांच्या शशिकला

प्रभाव काळांत होणाऱ्या स्त्रावाच्या लाल रंगावरून स्त्री आणि शक्तितत्वाला शोनबिंदु या नावाने लाल रंगाचे रुपक चिह्न स्वीकृत झाले. रजस्वला स्त्रीसाठी शशिकला प्रभाव काळ असे संबोधन वापरले गेले कारण त्या चार दिवसांत ऋतुमती स्त्रीच्या शरीरावर, चंद्राच्या (शशी) कलांचा प्रभाव असतो.





^ चित्र क्र १२ समभूज द्विमिती चौकोन ^ चित्र क्र १३ समभूज घन चौकोन

खगोलशास्त्र आणि फलज्योतिषशास्त्र यांच्या संकेतानुसार मंगळ या ग्रहाचा आणि राशी चक्रातील वृश्चिक राशीचा रंग लाल आहे. वेदकालीन सिंधू समाज प्राचीन प्रगत संस्कृतीमधे, अनेक रंगांचे तर्कसंगत भूमितीय आकार निश्चित केले गेले होते. द्विमितीय समभूज चौकोन (चित्र क्र १२) आणि त्रिमितीय समभूज घन चौकोन (चित्र क्र १३) ही लाल रंगाची प्रतीके आहेत. याबरोबरच लाल रंगाचे हे वैश्विक भूमितीय चिह्न, भूमीचे आणि जमिनीचेही प्रतीक आहे. तर्कसंगत भूमितीय संकल्पना अशासाठी म्हटले की आधी उल्लेख केल्यानुसार अपारदर्शकता, उष्णता आणि शुष्कता ही लाल रंगाची वैशिष्ट्ये आहेत आणि भूमी अथवा जमिनीची सुद्धा नेमकी हीच तीन वैशिष्ट्ये भूगर्भशास्त्रात सांगितली आहेत. अपारदर्शकता, काठीण्य आणि निर्मितीची प्रेरणा हे जमिनीचे गुणधर्म, लाल रंगाशी साधर्म्य दाखवतात.

वेगवेगळ्या संस्कृतीत...वेगवेगळ्या धर्म आणि पंथात...वेगवेगळ्या भाषांमधे, सर्वच रंग, विविध भिन्न अथवा समानार्थी भावना - संदर्भ सूचित करतात. एकेकाळच्या कम्युनिस्ट रशियातील मॉस्को या शहरातील 'लाल चौक' हे नामाभिधान लाल या रंगावरून आलेले नाही तर रशियन भाषेतील "क्रासनाया" या, "सुंदर" या समानार्थी विशेषणावरून घेतले गेले आहे. रोमन साम्राज्याच्या उत्कर्ष काळात प्रत्येक भव्य राजवाड्यातील भिंती, राज्यकर्त्यांच्या सामर्थ्याचे प्रतीके म्हणून लाल रंगाच्या शिल्पांनी सजवलेल्या असत. ख्रिस्ती धर्मबांधवांच्या चर्चमधील लाल रंग, येशू ख्रिस्ताच्या सांडलेल्या रक्ताशी नाते सांगतो. पाश्चिमात्य देशांत हाच लाल रंग, रक्तवर्णी आहे म्हणून लग्न समारंभात त्याज्य मानला गेला आहे. कम्युनिस्ट चिनच्या ध्वजावरील लाल हा त्यांचा राष्ट्रीय रंग आहे, चिनी समाजात तो पवित्र मानला जातो. प्राचीन इजिप्तमधे लाल रंग, आनंदी जिवन – उत्तम आरोग्य – अदृश्य, अमानवी शक्तीवर मिळवलेल्या विजयाचे प्रतीक मानला गेला होता.






^ चित्र क्र १४ भारतीय वधू लाल साडी ^ चित्र क्र १५ चीनी वधूचा लाल पहेराव

दोन भिन्न देशात अथवा प्रदेशात एकाच रंगाचे भिन्न अर्थ आणि संदर्भ, काही शतकांपासून लोकश्रुती बनले आहेत. भारत, चिन अशा पौर्वात्य देशात, वधू, लग्नाच्या समारंभात लाल रंगाचे परिधान वापरतात. (चित्र क्र १४ आणि १५) वधूवस्त्राचा हा लाल रंग पवित्र आणि भाग्यदाता आहे. मात्र पाश्चिमात्य देशांत हाच लाल रंग, रक्तवर्णी आहे म्हणून लग्न समारंभात त्याज्य मानला गेला आहे.

बऱ्याचदा आपण विकत घेतलेल्या खाद्यपदार्थांच्या बाहेरील वेष्टनावर लाल – अंबर – हिरवा या तीन रंगाचे छोटे ठिपके (डॉट) दिसतात. FDA (Food and Drug Administration) या सरकारी खात्याच्या नियमानुसार हे ठिपके काही निश्चित संकेत देतात. उच्च, मध्यम, कमी चरबी – सॅच्युरेटेड साखर आणि मीठ याचे पदार्थात प्रमाण किती आहे त्याचे संकेत हे ठिपके आपल्याला देतात.  लाल ठिपका जास्त प्रमाण – अंबर ठिपका मध्यम प्रमाण – हिरवा ठिपका कमी प्रमाण असे हे मापन संकेत आहेत.



^ चित्र क्र १६ लाल रंगाच्या विविध छटा

या लाल रंगाच्या असंख्य छटा आज आपण पहातो आणि आपल्या कळत – नकळत वापरतो सुद्धा.  स्कारलेट – रुबि – ब्लड – क्रिमझन – चेरी – सेरी – डीप – डार्क – कॅडमियम – व्हरमिलियन – मरून आणि या लाल रंगाच्या अन्य असंख्य छटांनी आपले दैनंदिन जीवन उत्साहित होत असते.



^ चित्र क्र १७ पालिओलीथिक काळ, खिस्तपूर्व पस्तीस हजार वर्षे, अलटामीरा स्पेन, रॉक पेंटिंग रेड ऑकर रंगाचा वापर



^ चित्र क्र १८  स्पेन मधील गुंफांमध्ये, निॲन्डरथल मानवाने (रेड ऑकर) लाल रंगातील या उभ्या आणि आडव्या रेषांचे केलेले रेखांकन, साधरण चौसष्ठ हजार वर्षांपूर्वीचे आहे.

--००--

# सर्जनशील हिरवा.

आपण लाल या प्राथमिक रंगाचा परीचय आणि त्याचे विविध चिह्नसंकेतही जाणून घेतले. लाल रंगानंतर त्याच्या विरोधी गटातला रंग आहे हिरवा. हिरवा विरोधी गटात अशासाठी की लाल रंगाच्या अगदी विरुद्ध दृश्य संकेत, हा हिरवाच देत असतो.

नेपोलियन या फ्रेंच सम्राटाच्या मृत्यूचे मिथक, या हिरव्या रंगाशी जोडले गेले आहे. वर्ष १७७५ मध्ये शील्स ग्रीन या रंगद्रव्यापासून, पी ग्रीन म्हणजे वाटाण्याच्या हिरव्या छटेचा रंग बनवला गेला होता. गालिचे – कापड – स्त्रीयांच्या गाऊनचे मऊशार कापड – भिंतीवर चिकटवायचे कागद (वॉल पेपर) – पॉटरी आणि मिठाई अशासाठी हा रंग वापरला जात असे. यातल्या वॉल पेपर मधील या हिरव्या रंगापासून, आरसेनिक या विषारी घातक द्रव्याचे कण हवेत पसरतात असे नंतरच्या काळांत लक्षांत आले होते. वर्ष १८१५ मध्ये वॉटरलूच्या लढाईत पराभव झाल्यानंतर, नेपोलियनला दक्षिण अटलांटिक समुद्रातील सेंट हेलेना या बेटावर हद्दपार करून विजनवासात ठेवले होते. वर्ष १८२१ मध्ये त्याचा मृत्यू झाला. त्याला ठेवले होते त्या कोठडीतिल भिंतींवर हे आरसेनिकयुक्त हिरव्या रंगाचे वॉल पेपर लावले होते. याच आरसेनिकमुळे त्याचा मृत्यू झाला असे मिथक, एकोणिसाव्या शतकात, लोकश्रुतीत प्रचलित होते.

नीळा आणि पिवळा या दोन प्राथमिक रंगाच्या मिश्रणाने बनलेला हिरवा रंग, पराकोटीच्या संमिश्र भावना-संवेदना व्यक्त करतो. निसर्गात सर्वत्र

दिसणारा हा हिरवा; नवा ऋतू-वसंत ऋतू, नाविन्य-ताजेपणा, उमेद-इच्छा-आकांक्षा, शाश्वत-अनादी-अनंत अशा होकारात्मक भावना–धारणा व्यक्त करतो. या बरोबरच; मत्सर-हेवा-असूया, भेसूर-भयानक, गूढ-रहस्यमय अशा नकारात्मक भावना - धारणाही व्यक्त करतो. या पराकोटीच्या विरोधी भावना आणि संवेदना, या रंगाच्या दृश्य स्वरूपांत आपल्या जागरूक मन आणि सुप्त मन अशा दोन्ही ठिकाणी नोंदविल्या जातात. याचवेळी, निसर्गातील विविध छटांतील हिरव्या रंगामुळे प्रकाशाची आणि शांततेची संवेदना निर्माण होते. मानसिक आणि शारीरिक तणावमुक्ती यावर खरे म्हणजे हा हिरवा रंग उत्तम इलाज आहे.






^चित्र क्र १ विषारी द्रव्य ^ चित्र क्र २ हलक्या हिरव्या रंगाचे मातीचे भांडे

हिरव्या रंगांच्या अनेक छटा म्हणजे आपले मन:स्वास्थ संतुलित ठेवण्यासाठीचा उत्तम इलाज आहे असे म्हटले जाते. शरीर स्वास्थ्यासाठी या रंगाचे दुसरे वैशिष्ट्य असे की आपल्या डोळ्यांसाठी हा सुखकारक आहे. हा रंग डोळे आणि नजरेला स्थिरता देतो कारण याच्याकडे पहाण्याची आपल्या डोळ्यांची क्षमता इतर रंगांपेक्षा जास्त आहे, म्हणून हा रंग आपल्या नजरेला सहनशील बनवतो. हा रंग जरी निसर्गाच्या आणि सजीवांच्या निर्मिती क्षमतेचा,

प्रत्यक्ष निर्मितीचा आणि सर्जनशीलतेचा रंग म्हणून आपल्या परिचयाचा असला तरी हा, अनेकवेळा व्यक्ति अथवा फळ-भाजीपाल्याची अपरिपक्वता सिध्द करतो. आता आंब्याचा मोसम सुरु झाल्यावर हिरवा आंबा पिकल्याशिवाय गोड आणि रसाळ होत नाही हे त्याच्या रंगावरून आपल्या सहज लक्षात येते.

अनुभव नसलेल्या व्यक्ति अथवा अपूर्ण काम याचा संदर्भ देताना, इंग्रजीमधे Green horn असे संबोधन वापरले जाते. विशेषकरून कॉंक्रीटचे ताजे बांधकाम, पाणी मारून नंतर पूर्ण सुकण्याआधी त्याला Green concrete असे संबोधन वापरले जाते. लाल रंग धोक्याचा इशारा देतो आणि त्या उलट हिरवा रंग सुरक्षिततेचा संकेत देतो अंबर किंवा पिवळ्याची छटा सावधानतेचा इशारा देते. चौकातील वाहतुक नियंत्रण खांबावर, लाल...हिरवा...अंबर या रंगांचा खेळ सतत सुरु असतो.

जाहिरातीच्या क्षेत्रांत आणि कुठल्याही वस्तूच्या वेष्टनावर, हिरवा रंग अगदी नेमक्या उद्देशाने वापरला जातो. आमची औषधे वापरासाठी सुरक्षित आहेत असा अलिखित संदेश आणि अशी खात्री, अनेक औषधांच्या वेष्टनावरील हिरवा रंग आपल्याला देतो. काही पूर्ण नैसर्गिक उत्पादनांच्या वेष्टनावर अशा हिरव्या रंगाचा वापर केलेला दिसतो. अनेक देशांच्या चलनी नोटा, हिरव्या रंगाच्या अनेक छटांमधे छापलेल्या दिसतात. काही पाश्चिमात्य देशात व्यवहारातले कायदेशीर चलन आणि अर्थविषयक गोष्टींसाठी, गडद हिरवा रंग प्रतीक म्हणून वापरला जातो. बहुतेक सर्व देशातील



लष्कराच्या सैनिकांचा गणवेश गडद हिरव्या रंगाचा असतो. या गडद हिरव्या रंगाच्या निव्वळ दर्शनाने आपल्याला सुरक्षित वाटते.

अनेक चित्रपटात, भेसूर-भयानक चेटकीण, हिरव्या रंगाच्या परिधानात किंवा चेहेऱ्याच्या हिरव्या रंगभूषेत चित्रित केलेली असते. अनेकदा, निर्जन रानातील तळ्यावर, पाण्याचा पृष्ठभाग पूर्ण झाकून टाकलेले हिरव्या रंगाचे शेवाळ आपल्याला दिसते. असा भयपटातील चेटकीण आणि अशा हिरव्या तळ्याकडे बघितले की भेसूर-भयानक, गूढ-रहस्यमय अशा नकारात्मक भावना – धारणा – संवेदना आपल्या मनात निश्चित निर्माण होतात.





^ चित्र क्र ३ सिनेमातील हिरवी चेटकीण. ^ चित्र क्र ४ पाण्यावरचे हिरवे शेवाळ.

ग्रहमालेतील शुक्र - बुध हे दोन ग्रह आणि अनुक्रमे शुक्रवार आणि बुधवार हे आठवड्यातील दोन वार आणि राशीचक्रातील वृषभ रास या सर्वांचे आपला हिरवा रंग प्रतीक आहे. फार प्राचीन काळापासून काही रंगांना विशिष्ट भूमितीय आकृतींच्या माध्यमातून व्यक्त केले गेले. द्विमिती षटकोन हे या रंगाचे

पहिले भूमितीय प्रतीक आहे. याचा प्रत्येक कोन ३० अंशाच्या कोनात वळणारा आहे. हिरव्या रंगाचे दुसरे त्रिमिती भूमितीय प्रतीक म्हणजे Icosahedron आकार. वीस समान समभूज त्रिकोणांचे पृष्ठभाग असलेली या त्रिमितीय आकृतीला, हिंदीमधे विंशतीफलक अथवा विंशफलक असे संबोधन वापरले जाते. या दोन्ही आकृतीचे एक वैशिष्ट्य निळया रंगाच्या वर्तुळाच्या एका वैशिष्ट्यांशी चिह्नसंकेत म्हणून जोडले गेले आहे. चौरस आणि आयताच्या तीव्र काटकोनापेक्षा या द्विमिती षटकोनाचे आणि त्रिमिती आकृतीचे हे तीस अंशाचे सहा कोन सौम्य आहेत आणि वर्तुळाच्या जवळ जाणारे आहेत. हिरवा रंग मानवी डोळयांना कुठलाही ताण न देता सुखावणारा रंग आहे, सौम्य कोन असलेल्या या दोन भूमितीय आकृती, ही प्राचीन मांडणी फार तर्कसंगत आणि विज्ञाननिष्ठ आहे.



^चित्र क्र ५ षटकोन हिरव्या रंगाचे द्विमिती भूमितीय प्रतीक



^चित्र क्र ६ हिरव्या रंगाचे त्रीमिती भूमितीय प्रतीक


हा रंग आवडणाऱ्या व्यक्ति किंवा या रंगाचा प्रभाव असलेला समाज यांचे एक खास वेगळे व्यक्तिमत्व उठून दिसते...!!..आजच्या घडीला, माझे हे विधान, परिस्थितीचा विपर्यास केल्यासारखे वाटेल कदाचित. मात्र काही अतिरेकी अपवाद वगळता, जगभरातील हिरव्या रंगाचा प्रभाव असणारा समाज स्वतःची खास संस्कृती जपून आहे. हिरव्या रंगाशी नाते असलेल्या व्यक्ति

आणि समाज, नेहमीच निसर्गासारखा ताजा-तवाना असतो, नैसर्गिक प्रवृत्तींशी प्रमाणिक असतो. सहिष्णू – सदाचारी – उदार मतवादी – दानशूर आणि निस्वार्थी या गुणवत्ता, अशा व्यक्ति आणि समाजाने धारण केलेल्या दिसतात. सतत प्रगति आणि आर्थिक उन्नती ही या रंगामुळे प्राप्त होणारी वृत्ती आहे. वस्तुनिष्ठ (Subjective) आणि विषयनिष्ठ (Objective) अनुभवाचा अभ्यास केल्यास लक्षात येते की प्रत्येकाच्या निद्रिस्त मनात, या रंगाने निर्माण होणाऱ्या संवेदना साधारण सारख्याच असतात. याच्या सानिद्ध्यात शांत-निवांत आणि ताजे तवाने वाटते. सभोवतालच्या निसर्गात सतत होणारी नवनिर्मिती आणि त्याची वाढ याने आपल्या नकळत आपणही प्रगती करत रहातो. या उलट व्यक्तीनिष्ठ आणि आत्मनिष्ठ किंवा Subjective संवेदना खूपच वेगळ्या असतात. एखादे चित्र – पुस्तक – कपडे - एखादी शारीरिक व्याधी -एखाद्या वस्तूची अथवा घटनेची भीती अथवा स्वत:ची एखादी चूक आणि या सर्वातील समाविष्ट हिरवा रंग अनेकदा मनात किळस अनेक गोष्टींविषयी घृणा सुद्धा निर्माण करतो.

या रंगाच्या अनेक छटा विविध संकेत देतात आणि मनांत संवेदनाही निर्माण करतात. एखाद्या चित्रातील अथवा कपड्याचा दृश्य स्वरूपातला गडद हिरवा रंग कामना – लालसा – महत्वाकांक्षा – मत्सर – ईर्षा –असूया अशा संवेदना एखाद्या व्यक्तीच्या मनात निर्माण करू शकतो. गडद हिरव्या रंगाच्या सानिद्ध्यात, भीती – विसंगती – असंबद्धता – मतभेद – असूया अशा संवेदना दुर्बल मनाच्या व्यक्तींमधे निर्माण होतात. जगभरातल्या तज्ञांनी नोंदवलेल्या अभ्यासाचा आढावा घेतला तर हिरवा रंग अनेक संदर्भांसाठी वापरला गेला आहे. भावना-संवेदना, राजकारण, धर्म, विज्ञान, कला, लिंग आणि पुराणकथा

आणि दंतकथा या सर्वांचे विश्लेषण करताना हिरव्या रंगाचा संदर्भ निश्चितपणे येतोच. इस्लाम धर्म ज्या वाळवंटी प्रदेशात स्थापन झाला त्याच्या ध्वजाचा हिरवा रंग काही निश्चित धोरणांनी निवडला असावा. या वाळवंटात हिरवळ हे अगदी दुर्मिळ दृश्य आहे. त्यामुळेच या ध्वजाचा रंग हिरवा असावा.

रंगांच्या अभ्यासा बरोबरच आपल्या डोळ्यांवर म्हणजेच आपल्या डोळ्यातील संवेदनशील फोटोरिसेप्टरवर रंगांचा परिणाम काय होतो ते पहाणे आवश्यक आहे. याचे कारण असे की डोळ्यातील फोटोरिसेप्टरवर नोंदलेला एखादा रंग क्षणांत आपल्या मेंदूमध्ये काही शारीरिक आणि काही भावनिक संवेदना निर्माण करतो. तेजस्वी लाल रंगाकडे आपण ३० सेकंदापेक्षा जास्त वेळ पहिले तर आपल्या डोळ्यांना थकवा येतो. या मागोमाग तुम्ही पांढऱ्या रंगाकडे पहिले तर आपल्या संवेदनेतील लाल रंग पुसला जातो आणि लाल रंगामुळे डोळ्यांवर पडलेल्या ताणावर नैसर्गिक इलाज म्हणून आपल्याला आपल्या नकळत, निसर्गतः हिरवा रंग दिसू लागतो. आपली जाहिरात किंवा उत्पादनाने लोकांच्या मनात पटकन संवेदना निर्माण कराव्या यासाठी याचा नेमका उपयोग, रंगांची निवड करताना चाणाक्ष डिझायनर करत असतात.



^ चित्र क्र ७ हिरवा रंग विविध छटा.

नीळा आणि पिवळा यांच्या मिश्रणाने हिरव्या रंगाच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या गटांतील अनेक छटा बनविल्या जातात. तिसऱ्या गटांतील छटा बनवताना या छटांना काळ्या आणि अन्य रंगांचा हलकासा स्पर्श केलेला असतो. या अनेक हिरव्या छटांची इंग्लिश नावे त्याचे नेमके स्वरूप सांगतात. एमराल्ड, जेड, स्प्रिंग, लाईम, ऑलिव्ह, मिडनाईट, टी, पाईन, फॉरेस्ट, इंडिया, हंटर, आर्मी, अव्हाकॅडो, ब्रिटीश रेसिंग ग्रीन, शॅमरॉक, हार्लीक्वीन, फर्न, मर्टल, मॉस, टील आणि सॅप...अशा असंख्य नावांनी वेगवेगळ्या स्वभावधर्माच्या हिरव्या रंगाच्या या छटा जगभरात ओळखल्या जातात. या प्रत्येक छटेला काही निश्चित चिह्नसंकेत आहेत. या प्रत्येक छटेला विशिष्ट कामासाठीच वापरले जाते. या सारख्या हिरव्या रंगाच्या अनेक छटा, यंत्रांमधील वैशिष्ट्य आणि वेगळेपणा दाखवण्यासाठी उद्योग जगतात वापरल्या जातात. शब्दमर्यादेमुळे त्या सगळ्याच छटांची नोंद इथे करता येणार नाही.

हिरव्याचा अभ्यास आणि हिरव्याची ही रंगगाथा...परस्पर विरोधी - थोडीशी गूढ तरीही खूप उत्साहवर्धक आहे हे निश्चित...!!

--००--



^ Green:  Picking Flowers पिअरे ऑगस्ट रेनॉय, सिएटल आर्ट म्युझियम

# आकाशाचा नीळा.

चिह्न आणि चिह्नसंकेतांच्या भिंगातून केलेला या रंगगाथेचा अभ्यास फार रंजक आहे आणि वाचकांसाठी तो लिहिताना फार लगबग होते आहे, इतके या प्रत्येक रंगाचे व्यक्तिमत्व विलक्षण आहे. देशोदेशींच्या विविध संस्कृती, परंपरा, लोकश्रद्धा, लोकश्रुति यामधे सापडणारे रंगांचे संदर्भ आणि प्राचीन साहित्यातील उल्लेख, आधुनिक विज्ञानाचा अभ्यास हे सर्व वाचकांसमोर ठेवताना यातले काही राहू नये अशी माझी लगबग आहे.

आपल्या चतुर पूर्वजांनी, वर्तुळ - पृथ्वीचा गोलाकार याचे भूमितीय चिह्न किंवा प्रतीक निळ्या रंगाला बहाल केले आहे. शीतलता, आर्द्रता, पारदर्शकता आणि भव्यता हे निळ्या रंगाचे सर्व गुणधर्म या एकाच गोलाकार चिह्नात व्यक्त होतात. अगणित – अपरिमित, ही या रंगाची वैश्विक वैशिष्ट्य या एका कोनविरहित वर्तुळात, प्राचीन पंडितांनी व्यक्त केली आहेत.



^ वर्तुळ - निळ्या रंगाचे भूमितीय प्रतीक.



^ आकाशाची निळाई

निळ्या रंगाची नजरेत न मावणारी व्यापकता, सुप्त आणि व्यक्त मनात दर्शकाचा आत्मसन्मान त्याच्या नकळत वृद्धींगत करते आणि शांत – विश्रांत

स्थितीची अनुभूती देते. हा रंग जसे ज्ञानाचे प्रतीक मानला जातो त्याबरोबरच हा रंग; प्रसन्नता, स्तब्धता, शांतता, स्थिरता अशा भावनाही निर्माण करतो. निसर्गाच्या अलौकीक शक्तीचा परिचय, असीम – अमर्याद – विश्रांत आकाशाचा हा रंग, अव्याहतपणे आपल्याला देत असतो. व्यापक आकाशाबरोबरच विशाल सागर आणि बर्फ, याचेही हा नीळा रंग प्रतीक मनाला गेला आहे. सत्य – शुचिता – पावित्र्य – निष्ठा – दया – क्षमा – करुणा – वात्सल्य अशा सर्व गुणवत्ता आणि मुल्ये यांची अनुभूती, या एका निळ्या रंगामुळे दर्शकाला होते.

आपण शाळेत शिकत असतांना पाहिल्या इयत्तेपासून पांढरी वही आणि निळ्या शाईचे पेन यांची संगत लाभते आणि ती अखेरपर्यंत टिकते. बॉलपेनच्या आधी फाऊंटन पेन वापरले जायचे आणि दररोज त्यात शाई भरावी लागत असे. आपल्या कपड्यांवर या शाईचे पडलेले अगणित डाग आजही आपल्या प्रत्येकाच्या स्मरणात आहेत.



^ शाईचा निळा रंग



^ इस्त्राएल राष्ट्राचा ध्वज

वैयक्तिक अथवा समाजजीवनात, आत्मसन्मान – प्रतिष्ठा – गौरव – परंपरांचा अभिमान अशा भावना या निळ्या रंगातून व्यक्त होतात. शब्द व्युत्पत्तिशास्त्रानुसार निळा अर्थात इंग्लिश blue हा शब्द मूळ bleu या फ्रेंच शब्दापासून प्रचलित झाला आहे. आजही  थायलंड, कोरिया आणि जपान या पौर्वात्य देशात bleu हा फ्रेंच शब्दच आजही निळ्या आणि हिरव्या रंगाच्या लिखित संदर्भात वापरला जातो. मात्र याच देशात, हा निळा रंग; अनुत्साह, कंटाळा, एकटेपणा अशा भावना व्यक्त करण्यासाठीही वापरला जातो. याच्या अगदी विरुद्ध, पाश्चिमात्य देशात; blue family (ब्ल्यू फॅमिली) अथवा blue blood (ब्ल्यू ब्लड)  अशी रंगाधारित संबोधने, राजकुल आणि राजा अथवा राणीच्या कुटुंबातील सदस्यांसाठी वापरली जातात. इस्राईल या देशाच्या ध्वजावर, पांढऱ्या पार्श्वभूमीवर निळ्या रंगाच्या दोन पट्ट्या आणि स्टार ऑफ डेव्हिडचे चिह्न, निळ्या रंगात असते. जुडाइझम किंवा सेमिटीझम अर्थात यहुदी – ज्यू धर्मबांधवांच्या प्रार्थनेचे वेळी, टॅल्लिट नावाची निळी शाल खांद्यावरून घेण्याची साधारण दोन हजार वर्षांपासून परंपरा आहे. या शालीच्या निळ्या रंगाचे रूपक या ध्वजाच्या रंगासाठी वापरले गेले. या रंग छटेला Yel blue (येल ब्ल्यू) असे नांव आहे. मात्र या निळ्या रंगाच्या छटेबद्दल ज्यू बांधव फार आग्रही नसल्याने निळ्याच्या अनेक छटा या ध्वजावर अंकित झालेल्या दिसतात.

आजच्या काळांत सर्वात लोकप्रिय असलेल्या यातिल निळया रंगाचा इतिहास फारच रंजक आहे. उत्क्रांती काळांत मानवाला फक्त काळा – पांढरा हे दोनच रंग आणि त्यांच्या राखाडी रंगाच्या छटा दिसत असंत. कालांतराने प्रथम त्याला लाल – पिवळा – हिरवा या रंगांचे दृष्टीज्ञान झाले. यांत निळा रंग वेगळा आहे हे त्याला फार उशिराने ओळखता येऊ लागले. रंगांच्या इतिहासकारांनी हे सप्रमाण सिद्ध करण्यासाठी, भाषा व्युत्पत्तीशास्त्राचे अनेक दाखले दिले आहेत. ग्रीक – चीनी – जपानी आणि हिब्रू या चार प्राचीन भाषांमध्ये **निळा रंग** असा शब्द नाही किंवा त्याला समानार्थी शब्दही नाही. त्या काळांत **निळी छटा** ही हिरव्या रंगातील एक छटा आहे असे मानले गेले होते. कोरियन – व्हीएट्नामी – थाई – कुरडिश – झुलू – हिंबा या भाषांमध्ये आजही निळा रंग हा शब्द नाही. निळया रंगाचा उल्लेख करतांना Green-Blue Blurring असा शब्द प्रयोग वापरला जातो. होमर या ग्रीक कवीचा जन्म  ख्रिस्तपूर्व वर्ष ७५० मधे झाला. ओडिसी या त्याच्या जगप्रसिद्ध कवितेत, निळया सागराचे वर्णन करताना त्याने wine dark sea असा शब्दप्रयोग वापरला आहे. And what if one of the Gods wreck me out on the wine-dark sea…?

भारतीय संस्कृतीत, प्रभू रामचंद्र आणि श्रीकृष्ण ही आपली आराध्य दैवते आहेत. यांच्या प्रतिमा आणि चित्र बघतांना यांच्या निलकांती त्वचेचा प्रभाव आपल्यावर बालपणापासून पडलेला असतो. वेदांच्या निर्मितीपासून, चोवीस हजार वर्षांपासून प्राचीन भारतीय लिखित साहित्यात या निळया रंगाचे

असंख्य संदर्भ आजही वाचता येतात. म्हणूनच आपली प्राचीन संस्कृति वैज्ञानिक दृष्ट्या किती प्रगत आहे यांची जाणीव होते.

विसाव्या शतकाच्या अखेरच्या टप्प्यात विकसित आणि प्रगत झालेल्या माहिती - तंत्रज्ञान या विषयाची एक वेगळी भाषा आहे त्याला HTML म्हणजे Hyper Text Mark up Language असे म्हटले जाते. या HTML ची, आपल्या रंगासंदर्भात असलेली मांडणी पहाणे महत्वाचे आहे. मोबाईल हँडसेट आणि कॉम्प्युटरच्या स्क्रीनवर दिसणाऱ्या रंगीत प्रतिमा, Red – Green – Blue Light चा...म्हणजे लाल – हिरव्या – निळ्या किरणांचा योग्य वापर करून तयार केल्या जातात. यालाच RGB असे संबोधन वापरले जाते. Hexadecimal notation म्हणजेच HEX हे HTML च्या या तीन रंगांचे प्रमाण आहे. या प्रमाणानुसार या तीनपैकी प्रत्येक रंगांचा प्रभाव कमी अथवा जास्त करता येतो. याच तंत्रज्ञानाने, मोबाईल हँडसेट आणि कॉम्पुटरच्या स्क्रीनवर दिसणाऱ्या रंगांच्या १६० लाख छटा बनवता येतात. अगणित रंगछटांचे हे वैविध्य आणि तंत्रज्ञानाची प्रगती आपल्याला अचंबित करते.

लाल, केशरी आणि पिवळा हे रंग दर्शकाच्या भावनाशील संवेदनांच्या जवळ असतात. या उलट, निळा रंग दर्शकाच्या वास्तवाच्या जाणीवा आणि प्रज्ञा आणि बुद्धीच्या संवेदनांच्या जवळचा असतो. कौशल्य, स्थिरता, गांभीर्य, सखोलता या मर्दानी गुणवत्ता, नवे तंत्रज्ञान आणि त्याची अचूकता, हे सर्व

निळ्या रंगाच्या वापरने दर्शवले जाते. मर्दानी रंग म्हणून निळा जगभरात स्वीकृत आहे या उलट गुलाबी रंगाच्या नाजूक छटा नेहेमीच स्त्रीत्वाचे प्रतीक मानल्या गेल्या. खूप विशाल उद्योग आणि व्यवसाय, अनेक समाजाभिमुक कार्य करणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्वयंसेवी संस्था या सर्वांनी आपल्या ध्वज आणि परिचय चिह्नासाठी आग्रहाने निळ्या रंगाचा वापर केलेला दिसतो. बोईंग – hp – इंटेल – फोर्ड – फॉक्सवॅगन - BMW – DELL – फेसबुकचा f – सॅमसंग – सिमेन्स – फिलिप्स आणि IBM या सर्व आंतरराष्ट्रीय उद्योगांचे मूळ लोगो निळ्या रंगात आहेत. NASA, NATO, UN, UNESCO, UNICEF, Council of Europe, European Union अशा संघटना आणि इंग्लंड – न्यूझीलंड – ऑस्ट्रेलिया या देशांच्या ध्वजाचा प्रमुख रंग निळा आहे.


लाल + निळा + पिवळा + हिरवा अशा सर्व रंगाचा वापर अनेक लोगोमधे केलेला दिसतो. असे लोगो फार यशस्वी झालेले दिसतात. यातील प्रत्येक रंगाचा संतुलित वापर कसा केला आहे याची नोंद घेणे अवश्यक आहे. हेच रंगांचे दृश्य स्वरूपातील चिह्नसंकेत आहेत. ऑलिम्पिक चिह्न – गुगल – NCB – मायक्रोसॉफ्ट असे काही खूप यशस्वी लोगो आपल्याला नित्यनेमाने दर्शन देतात. निळ्या रंगाचे हे कौतुक होत असले तरी एक गमतीशीर सत्य

जाणून घ्यायला हवेच असे आहे. निळा रंग भूक कमी करतो असा काही कसोट्यांवर सिध्द झालेला वैज्ञानिकांचा अनुभव आहे. त्यामुळे खाद्य पदार्थांच्या वेष्टनांवर, निळा रंग चुकून सुद्धा वापरला जात नसतो.


राशीचक्रातील तूळ आणि धनु या दोन राशींचा रंग निळा आहे. या बरोबरच शनि, गुरु, शुक्र हे ग्रह आणि चंद्राचे, निळा रंग हे तात्त्विक रूपक चिह्न आहे. दुर्बिणीतून निरीक्षण करतांना आपल्या डोळयांना हे ग्रह निळे दिसतीलच असे मात्र नाही. निळया रंगाच्या निव्वळ दर्शनाने, आपल्या मनात आपसूक काही जाणीव - भावना निर्माण होतात. याची आर्द्रता आणि पारदर्शकता या प्रथम निर्माण होणाऱ्या दोन महत्वाच्या जाणिवां. वस्तुनिष्ठ अथवा हेतुपूर्वक, वास्तव विचार करताना या रंगाचे एक खास व्यक्तिमत्व आहे. मनावरचे एखादे दडपण बाजूला सारून, स्वतःच तणावमुक्त होणे, या रंगाच्या सानिध्यामुळे काही व्यक्तींना अनुभवता येते. मात्र काही व्यक्तीना उदास आणि खिन्न अशा भावना निर्माण करणारा हा रंग, एकाचवेळी शांत आणि संयम अशाही भावना देणारा आहे. राजनिष्ठा, चातुर्य, सत्य, प्रामाणिकपणा, आत्मसन्मान, आत्मगौरव आणि भव्यता अशा सर्व भावना हो रंग निर्माण करतो. या उलट व्यक्तीनिष्ठ गृहीतकांचा म्हणजेच व्यक्तीच्या समजुतीचा अनुभव वेगळाच आहे. अनेक व्यक्ती या रंगामुळे खिन्न-उदास-भीतीग्रस्त होतात आणि अनेकांना एकांत हवासा वाटतो.

काही प्राचीन आणि काही आधुनिक संस्कृतीतील समाज जीवनात निळया रंगाच्या उपयोगाचे विविध संदर्भ आणि अर्थ पाहायला मिळतात.

प्राचीन इजिप्शियन संस्कृतीमधे आराध्य देव-देवता आणि राजे-राण्या यांच्या चित्रांमधे त्यांना निळे पंख आणि निळ्या रंगाच्या दाढ्या रंगवलेल्या असत. एकोणीसाव्या शतकाच्या प्रारंभी ब्रिटनमधे निळा रंग अधिकारदर्शक मानला गेला आणि पोलीसदलाचा गणवेश निळ्या रंगाचा झाला. ब्रिटीश पारंपरिक विवाह समारंभात, वधूने तिच्या परीधानात छोट्या स्वरूपांत निळ्या रंगाचा वापर करण्याची परंपरा आजही पाळली जाते. ख्रिस्ती धर्मसंकेतानुसार, येशू ख्रिस्ताची आई मेरी, नेहेमी निळ्या रंगात रंगवली जाते. याउलट प्राचीन भारतीय संस्कृतीनुसार, श्रीराम आणि श्रीकृष्ण या दोन देवांच्या प्रतिमा निळ्या वर्णामधे चित्रित केल्या जातात. इंग्लिश भाषेतील ब्ल्यू जोक किंवा ब्ल्यू फिल्म या दोन संज्ञा मात्र अश्लीलता सूचित करतात.



^ निळा रंग गडद छटा



^ निळा रंग हलक्या छटा

निळ्या रंगांच्या अनेक छटांच्या वापरामुळे विविध अर्थ आणि संदर्भ सूचित केले जातात अथवा अनेक संवेदनांसाठी वापरले जातात. ॲक्वा आणि

ॲक्वामरीन ही छटा पाण्यासाठी तर नेव्ही ही छटा सागरी सैनिकांसाठी, अझूर आणि सेरुलिअन या  आकाशासाठी, कोबाल्ट ही छटा एका धातूसाठी तर पर्शियन आणि इजिप्शियन या छटा प्राचीन संस्कृतींचा परिचय देतात. टरक्वाईज, फिरोजा आणि सफायर या मौल्यवान खड्यांच्या छटा आहेत. अल्ट्रामरीन, स्टील ब्ल्यू, पावडर ब्क्यू, रॉयल ब्ल्यू, इंडिगो आणि रेझोल्युशन ब्ल्यु अशा निळ्या रंगाच्या अन्य छटा अनेक कारणांनी व्यवहारात वापरल्या जातात.

भव्य आकाशाच्या रूपाने हा प्रभावी, आश्वासक निळा रंग आपल्या दैनंदिन जीवनात कायमचा भरून राहिलेला असतो.

--०० --



Blue

"And what if one of the gods does wreck me out on the wine-dark sea?" (The Odyssey, Homer)

# सुवर्णकांतीचा पिवळा.

आपली रंगांच्या दुनियेतली भ्रमंती सुरूच रहाणार आहे. आता वसंत ऋतूची रंगीत तालीम झाली की त्याचीही रंगांची उधळण थक्क करणारी असेल. आता गावागावात आणि शहराशहरात, सगळी पाने झडून फुलांनी फुललेला लाल आणि पांढरा पांगारा, रंगीत पक्षांना आकर्षित करतो आहे. मे महिन्याच्या अखेरीस पावसाच्या प्रतीक्षेत गुलमोहर, लाल – गुलाबी पासून शेंदरी रंगांच्या छटांनी समृध्द होईल. पावसाच्या पहिल्या सरींनी मृदगंधासह झाडांवरील हिरव्या रंगांच्या प्रत्येक पानावर अगणित छटांचे अनोखे प्रदर्शन भरेल. माझ्या घराच्या खिडकी समोरचा करंजा, हिरव्या+पिवळयाचि सरमिसळ असलेल्या पोपटी छटांची भरगच्च महिरप मांडून आधीच तयार आहे. वसंत ऋतूचे स्वागत करण्यासाठी बहावा आणि शंकासूर आपल्या पिवळयाजर्द रंगछटांनी परिसर सोन्याचा करत आहेत.



^ बहावा वृक्ष.

लाल आणि निळ्या नंतर आपला उरलेला तिसरा प्राथमिक रंग आहे पिवळा. भिन्न संस्कृतींमधे हा विविध संदर्भ सूचित करतो. हा रंग सूर्य, सूर्यप्रकाश आणि रोज फुलणारे नवे जीवन याचे दृश्य प्रतीक आहे. मात्र काही संस्कृतींमधे हाच पिवळा रंग; कपट, फसवणूक, लबाडी, विश्वासघात, धोका अशा संदर्भाने वापरला गेला आहे. येशू ख्रिस्ताला फाशी देणाऱ्या व्यक्तींनी पिवळ्या रंगाचा अंगरखा घातला होता, या बायबल मधील उल्लेखानुसार ख्रिस्ती धर्मबांधवाना पिवळा रंग वर्ज्य आहे. इस्लाम धर्मसंकल्पनेनुसार फिकट पिवळा रंग, विश्वासघात आणि धोका सूचित करतो. या उलट तेजस्वी आणि उजळणारा पिवळा रंग हा चातुर्य आणि बुद्धिमत्तेच प्रतीक आहे. चिनी दंतकथांमधे, देवाने पहिला माणूस पिवळ्या रंगाच्या मातीतून बनवला म्हणून चिनी नागरिक पीतवर्णाचे असतात अशी एक आख्यायिका आहे. चीनमधे राज्यकर्ता राजा देवस्वरूप मनाला जातो, त्याचे पारंपरिक परिधान नेहमी पिवळ्या रंगाचे असते. प्राचीन भारतीय संस्कृतीनुसार अनेक चित्र – प्रतिमांमधे देव-देवतांचे पवित्र वस्त्र आणि परिधान पिवळ्या रंगाचे म्हणजेच पीतांबर असते. जेजुरीचा मल्हारी म्हणजे सर्वशक्तिमान महादेवाचे एक रूप. याला सूर्यप्रकाशाचा पिवळा रंग प्रिय आहे. म्हणूनच श्रद्धा आणि भक्तीने याला हळदीचा भंडारा वाहिला जातो.





^ जेजुरीचा भंडारा.

एका बाजूला मौल्यवान सोन्याचे रूपक असलेला हाच रंग, वाढत्या वयाचा सूचक आहे. निसर्ग नियमानुसार जीर्ण होणारी झाडाची पाने गळून जाताना पिवळा रंग धारण करतात. आपल्या डोळ्यांच्या रचनेमधे, लाल रंग सर्वात आधि आपले लक्ष वेधून घेतो. त्यानंतर आपल्या डोळयांत भरणारा दुसरा रंग आहे ताजा आणि उल्हसित करणारा पिवळा. हा पिवळा आपल्याला उत्साहित करतो, कामं सुरु करायला उन्मेष, प्रोत्साहन देतो. मात्र याच्या अति वापराने चित्त विचलित होते आणि तणाव निर्माण होतो. पूर्ण पिवळ्या रंगाने रंगवलेल्या खोलीत लहान मुले जास्त रडतात, असे रंगांचा वैज्ञानिक अभ्यास करतांना लक्षात आल आहे. काळया आणि पिवळयाचा जोडीने वापर केला जातो तेंव्हा ही जोडी सगळयात प्रथम आपले लक्ष वेधून घेते. म्हणूनच शहारातील टॅक्सी नेहेमीच काळया+पिवळया रंगाने रंगवल्या जातात. रस्त्याचे दुभाजक आणि वळणावरच्या भिंती सुद्धा काळया+पिवळया पट्ट्यांनी रंगवलेले असतात. वेगात जाणाऱ्या वाहन चालकाचे लक्ष, या धोक्याकडे वेधून त्याला दुरूनच सावध करण्याचे काम ही रंगांची जोडी करते.



^ काळा+पिवळा सावधानतेचा इशारा



^ काली + पिली मुंबई टॅक्सी

मध्ययुगीन युरोपमधे, साधारण बाराव्या शतकांत, लढाईच्या वेळी वापरल्या जाणाऱ्या मोठ्या ढाली बनवल्या गेल्या. या ढाली रंगवताना त्यावर पिवळ्या रंगाचा प्रभावी वापर केला गेला. राजा आणि राज्याप्रति असलेल्या

निष्ठा आणि विश्वासाचे प्रतीक असा संदर्भ ढालीवरील या रंगाला त्यावेळी होता. कलांतराने झालेले पराभव आणि फंद – फितुरीच्या घटनांमुळे हा पिवळा रंगच भ्याडपणा आणि भेकडपणाचे रूपक बनला.


साधारण पंधराव्या शतकात इंडियन यलो हे पिवळ्या रंगाचे रंगद्रव्य (Pigment) पर्शियामार्गे पाश्चिमात्य देशांत विशेषतः युरोपात पोहोचले होते. याला इंडियन यलो संबोधले गेले होते कारण त्याकाळी याची निर्मिती फक्त भारतात होत होती. वर्ष १७८६ मधे हौशी चित्रकार रॉजर डेव्हर्स्ट याने मित्राला पाठवलेल्या एका पत्रात उल्लेख केला होता की अलीकडे मी भारतातून आलेल्या सेंद्रिय (Organic) पिवळ्या रंगद्रव्याचा वापर चित्रात करतो आहे. पुढे तो लिहितो की हळदीच्या पानांचे खाद्य दिलेल्या जनावरांच्या मूत्रापासून हे रंगद्रव्य भारतात बनवले जाते. एकोणिसाव्या शतकात मेरिमि आणि जॉर्ज फील्ड यांनी भारतात येऊन यांचा शोध घेतला होता. गाईना आंब्याच्या पानांचा खुराक दिला की त्यांचे मूत्र पिवळ्या रंगाचे होत असे. यापासून पिवळे रंगद्रव्य बनवले जात असे. काही प्रदेशात उंटांच्या मूत्रापासून असे पिवळे रंगद्रव्य बनवले जात असे. भारतातील अशा अनेक पारंपरिक व्यवसायांवर ब्रिटिश राजवटीत जाणीवपूर्वक बंदी आणली आणि हा व्यवसाय अस्तंगत झाला.

छापील रंगीत जाहिराती – जाहिरात फलक – टेलिव्हिजन असा जाहिरात क्षेत्राचा व्याप आणि दर्शकवर्ग फार मोठा आहे. लहान-तरुण-मध्यमवयीन-वृद्ध, स्त्री-पुरुष अशा सर्व वयोगटातील समाजाचा अभ्यास, त्या प्रत्येक गटाच्या मानसिकतेचा अभ्यास, या क्षेत्रातील तज्ज्ञ नेहेमीच करत असतात. अशा अभ्यासाने जाहिरातीचे डिझाईन, मॉडेल आणि त्यातील रंग,

याचि अचूक मांडणी केल्याने त्यांच्या उत्पादनाची विक्री वेगाने वाढते. यातील रंगांची योग्य निवड करताना काही निश्चित आडाखे बांधलेले असतात. समर्पक उदाहरण द्यायचे झाले तर पुरुष दर्शकवर्ग आणि जाहिरातीत वापरलेला पिवळ्या रंगाचा प्रभाव याचे देता येईल. पुरुष दर्शक वर्ग या पिवळ्या रंगाला स्वाभाविक रंग मानतो. याचा अर्थ या दर्शक वर्गासाठी आणि ग्राहक गटासाठी, पिवळा रंग उत्साहीत करतो पण त्याच बरोबर त्यांच्यासाठी तो रंग बालिश असतो. ग्राहक महिला वर्ग पिवळी साडी – पर्स – बांगड्या – पिवळे परिधान निश्चितपणे विकत घेतात. या उलट पुरुष ग्राहक साधारणपणे पिवळा शर्ट – पिवळी पँट – पिवळे वाहन किंवा पिवळे फर्निचर विकत घेणार नाही. जाहिरात तज्ञांच्या अशा अभ्यासामुळे आपल्या लक्षात येते की पुरुष ग्राहक गटासाठी बनवलेल्या कुठल्याही माध्यमातील जाहिरातीमधे पिवळ्या रंगाचे प्रमाण फार मर्यादित असते.



^ पिवळ्या रंगाचे भूमितीय प्रतीक.



^ सावधान चिह्न


शीर्ष खाली असलेला समभूज त्रिकोण हे भूमितीय चिह्न पिवळ्या रंगाचे प्रतीक आहे. उलट्या त्रिकोणाच्या या मुद्रेला, प्रतीकशास्त्रात आणि चिह्नसंकेतांच्या भाषेत, उन्नत किंवा उदात्त मुद्रा असे संबोधित केले गेले आहे. प्राचीन भारतीय संस्कृतीत असा त्रिकोण हे पार्वतीचे म्हणजे विश्वातील शक्तीतत्वाचे प्रतीक आहे. सूर्यप्रकाशाकडे उन्नत होणारा असा पिवळ्या रंगाचा

समभूज त्रिकोण, ऐहिक – भौतिक संदर्भापेक्षा दिव्य – अलौकिक शक्तीचे प्रतीक आहे. काचेच्या लोलकातून प्रकाश किरण गेले की सात रंगांचा वर्णपट दिसतो, हे शाळेत विज्ञानाच्या तासाला आपण सर्वांनी ऐकलेले आणि कदाचित पाहिलेलेही असते. वर्षा ऋतूत पाऊस पडत असताना, पाण्याच्या अगणित थेंबातून प्रकाश किरण गेले की असाच क्षितिजावर अंकित झालेला सप्तरंगी इंद्रधनुष्याचा वर्णपट म्हणजे स्पेक्ट्रम आपल्याला दिसतो. या वर्णपटात सर्वात जास्त दृश्यमानता आपल्या पिवळया रंगाची असते, म्हणजे यातील पिवळा रंग, निसर्गतः, सर्वात आधी आपल्याला आकर्षित करतो. पिवळया रंगाच्या या वैशिष्ट्यामुळे जगभरांत शीर्ष वर असलेला पिवळा त्रिकोण अनेक प्रकारच्या सावधानतेचा इशारा देण्यासाठी वापरला जातो. रासायनांची वाहतूक करणाऱ्या टँकरच्या मागे किंवा विजेचा मोठा दाब असलेल्या ठिकाणी अशी पिवळया त्रिकोणाची असंख्य चिह्न आपल्याला सावधानतेचा इशारा देत असतात.



उत्साही, प्रकाशमान, उष्ण, तेजस्वी अशा व्यक्त गुणवत्ता असलेला आपला पिवळा रंग नियमितपणे सूर्यप्रकाशाची अनुभूती देतो. चेतना देतानाच हा आपल्याला सावध, चौकस आणि सतर्क बनवतो. हा रंग, खगोलातील बुध ग्रह, आठवड्याचा बुधवार आणि राशीचक्रातील मिथुन आणि सिंह अशा सर्वांचे प्रतीक मनाला गेला आहे. चाणाक्ष वृत्ती, एकाग्रता, काम करण्याची प्रेरणा आणि चिकाटी, मोहकता, आत्मविश्वास, प्रसन्नता, समाधानी वृत्ती या सर्व गुणवत्ता, ही या रंगाची वैशिष्ट्ये आहेत. मात्र या बरोबर ईर्षा, द्वेष, मत्सर या भावना सुद्धा याच्या सानिद्ध्यात प्रखर होतात.

प्राचीन इजिप्त मधे पिवळा रंग हेवा, असूया आणि मत्सराचे प्रतीक मनाला गेला होता. आजही युरोपमधील काही ठिकाणी हा पिवळा, भ्याड वृत्ती आणि भेकडपणाचा सूचक मनाला जातो. ऑस्ट्रेलियातील मूळ निवासी आजही, हा रंग मृत्यूचे प्रतीक मानतात. चिनी संस्कृतीमधे हा सूर्यप्रकाशाचे प्रतीक झाला आणि चिनच्या पहिल्या सम्राटाचे नांव ‘ह्युआंग टी’, याचा शब्दशः अर्थ पिवळा राजा असा आहे.



< पिवळ्या रंगाच्या छटा

पिवळया रंगाच्या असंख्य छटा निसर्गात जशा उपलब्ध आहेत तशाच मानवनिर्मित रोजच्या वापरातील वस्तूंमधे सुद्धा आहेतच. ही रंगछटांची नांवे जरी इंग्लिश असली तरी सर्वच आपल्या परिचयाचीच आहेत. त्यांचा निश्चित अर्थही आपल्याला माहीत आहेच. वाहतूक नियंत्रक खांबावरील लाल आणि हिराव्यासह खांबावर दिसणारा अंबर, कॅनरी या नावाने परिचित सुंदर पिवळा धम्मक पक्षी, सोन्याचा रंग गोल्ड अशा पिवळयाच्या अनेक परिचित छटा आपल्या परिचयच्या आहेत. या बरोबरच बनाना, लेमन, मेझ, ओरीअलीन, नेपल्स, ओल्ड गोल्ड, पेल, बिटर, सॅफराँन, स्ट्राँ....अशा वेगवेगळया संदर्भाने येणाऱ्या पिवळया रंगाच्या अन्य छटा आपल्याला रोजच दर्शन देतात...!!

वसंत ऋतूचे स्वागत करण्यासाठी आपणही बहाव्याच्या या सोनेरी-पिवळया मोहक झूपक्यांचा आनंद घेऊया...!!

--00--



< Yellow Sunflowers: बी विनसेंट व्हॅन गॉघ

How wonderful the colour yellow is. It stands for the sun!"

(Vincent Van Gogh)

# केशरी – भगव्याच्या करामती.

भारतीय ध्वजातील सगळ्यात वरचा पहिला रंग भगवा, नारिंगी किंवा केशरी. याला इंग्लिश मधे ऑरेंज आणि सॅफ्रॉन अशी दोन संबोधने आहेत. प्राचीन भारतीय धर्म संस्कृती, भारतीय समाजजीवन, भारतीय राजकारण, भारतीय परिधान आणि रसना  या सर्व संदर्भात हा अत्यंत महत्वाचा रंग. पुरुषांचा फेटा–कुडता–धोतर–उपरणे आणि स्त्रियांच्या साड्या आणि अन्य परिधाने अशा सर्व ठिकाणी स्वीकृत असा हा रंग. निवडणुकांच्या काळात सर्वात जास्त लोकप्रिय आणि त्याचवेळी अप्रिय असा हा केशरी रंग.



^ भारतीय तिरंगा

लाल आणि पिवळा या दोन प्राथमिक रंगांच्या मिश्रणातून बनणारा हा रंग. याच दोन प्राथमिक रंगांच्या प्रभावामुळे, व्यक्तीचे आत्मभान म्हणजे वृत्ती आणि वासना म्हणजे चित्त या दोन्हीचे योग्य संतुलन रहाते. या प्रभावामुळे हा केशरी रंग मानसिक आणि शारीरिक आरोग्य अबाधित ठेवतो. याच गुणवत्तेमुळे, प्राचीन काळापासून भारतीय संस्कृतीत हा रंग स्वीकृत झाला आहे, महत्वाचा मानला गेला आहे. भगव्या रंगाला केशरी असे संबोधले गेले याला कारण केशर हे फुलापासून मिळणारे तंतु या रंगाचे असतात. या तंतूमधील

क्रोकेरिन या द्रव्यामुळे हा रंग निर्माण होतो. भारतीय पदार्थांमध्ये या रंगासाठी केशर वापरले जाते. प्राचीन आयुर्वेदातील उल्लेखानुसार, श्वासनालिकेचा दाह, घशाचे विकार, त्वचेचे विकार या सर्वांवर केशर गुणकारी आहे. आतडयाचे आकुंचन करणारे, भूक वाढवणारे, मासिक पाळी सुरु करणारे, कामोत्तेजक हे केशर मादक, सुवासिक, शक्तिवर्धक, उत्तेजक आहे आणि रेचक आणि मूत्रल या गुणधर्मासाठी आयुर्वेदातील औषधांत वापरले जाते.





^ भगवा ध्वज, ^ रांगडा भगवा फेटा. ^ केशर

केशरी रंग हा खरं म्हणजे उष्ण प्रकृतीचा रंग आहे मात्र लाल रंगाइतका हा आपल्या डोळयांवर तणाव निर्माण करत नाही. स्फूर्ती, उत्साह या बरोबरच केशरी रंग, आपल्या चित्त – वृत्तीला उर्जित करून विचारांना प्रेरित करतो. प्राचीन भारतीय संस्कृतीत; राष्ट्रप्रेम, स्वाभिमान, आत्मसन्मान, श्रद्धा, भक्ती, महत्वाकांक्षा अशा भावना आणि धारणांचे, केशरी – भगवा रंग प्रतीक बनला आहे. या बरोबरच; राजकारण, धर्म, लिंग, विज्ञान, कला, मिथके आणि पुराणशास्त्र अशा अनेक गोष्टींशी हा रंग जोडला गेला आहे. छत्रपती शिवाजी महाराज आणि महाराणा प्रताप यांच्या शौर्याशी, झाशीची राणी लक्ष्मीबाई हिच्या त्यागाशी आणि वारकऱ्यांच्या विठ्ठलावरील श्रद्धा आणि भक्ती याच्याशी केशरी – भगवा, दृश्य स्वरूपांत चिह्नांकित झाला आहे.

आत्मसन्मान अबाधित ठेवण्यासाठी आणि शत्रूशी लढताना मृत्यूला कवटाळणारा केसरिया हे समर्पण राजस्थानातील शतकांपूर्वीच्या स्त्रियांची खास परंपरा होती. या पराकोटीच्या तीव्र भावनांमुळे, सामान्यतः तरुण वयाला या रंगाचे नेहमीच आकर्षण वाटते. लिंबूवर्गीय फळांचा रंग असल्याने हा रंग क्षुधावृद्धी करतो म्हणजे भूक वाढवतो म्हणूनच आरोग्यदायी अन्नाच्या उत्पादनांच्या वेष्टनावर हा रंग प्रामुख्याने वापरला जात.

आपल्या प्राचीन भारतीय संस्कृतीत, वर वर्णन केलेल्या भगव्या अर्थात ऑरेंज या रंगाचा स्त्रीयांच्या संदर्भातला संकेत, आता याच भावार्थाने जागतिक पातळीवर स्वीकारला गेला आहे. संयुक्त राष्ट संघटनेच्या सेक्रेटरी जनरल यांनी वर्ष १९९१ मधे ‘एंड व्हायोलन्स अगेन्स्ट् वूमेन’ ही आंतरराष्ट्रीय चळवळ सुरू केली. वर्ष २०२१ हे या चळवळीचे तिसावे वर्ष आहे. जगभरातील महिला आणि मुलींवर होणारे अत्याचार आणि त्यांना दिली जाणारी हिंसक वागणूक थांबावी हा याचा उद्देश आहे. दरवर्षी २५ नोव्हेंबर आणि १० डिसेंबर या सोळा दिवसांच्या कालावधीत, ही चळवळ जगातील १८४ देशांत या संदर्भात जाणीव जागृतीचे कार्यक्रम संघटित करत असते. या चळवळीच्या शीर्षकात, **Orange the World** असे उपशीर्षक जोडले आहे. स्वाभिमान, आत्मसन्मान, श्रद्धा, भक्ती अशा या स्त्रीयांचा आत्मगौरव आणि आत्मसन्मान अबाधित ठेवण्याच्या, या चळवळीतील भावना आणि धारणांचे, केशरी – भगवा रंग प्रतीक बनला आहे.

**“Orange the World: END VIOLENCE AGAINST WOMEN NOW!”**

**United Nations Secretary-General’s Campaign**

**UNiTE by 2030 to End Violence against Women**

**16 Days of Activism against Gender-Based Violence Against Women & Girls**

**25 November - 10 December 2021**

या संत्र्याच्या फळांचा फार प्राचीन इतिहास चीन आणि भारत या देशांशी जोडलेला आहे. साधारण साडेचार हजार वर्षांपूर्वी तत्कालीन **Silk Route** या मार्गाने हे संत्रे उत्तरपश्चिम भारतात आले. या फळाला त्याच्या रंगावरून **नारंगा** हे संस्कृत नांव मिळाले. संस्कृत भाषेतला हा शब्द जगभरातील या फळाच्या नावाचे मूळ आहे. भारतातून या संत्र्याचा प्रवास आखाती देशांत झाला. फारसी भाषेत या फळाला **नारंग** म्हटले गेले, अरेबिकमधे **नारंज** म्हटले गेले आणि स्पॅनिश भाषेत हे फळ **नारंजा** झाले.






< ऑरेंज

भाषा व्युत्पत्तीशास्त्रानुसार, या रंगाला Orange – ऑरेंज हे नांव मिळण्यामागे खूपच रंजक इतिहास आहे. इंग्लिश Orange हे Noun (नाम) आहे आणि Adjective (विशेषण) सुद्धा आहे. ऑरेंज या फळांची बागायत मध्ययुगात भारता व्यतीरिक्त फक्त स्पेन आणि पोर्तुगाल मधे होत असे. कालांतराने पोर्तुगीजांनी इंग्लंड मधे या फळांची निर्यात सुरू केली. स्पेन – पोर्तुगाल मधील a naranga आणि a naranja हे दोन शब्द प्रथमच इंग्लंडमधे पोहोचल्यावर यांचा अपभ्रंश झाला. इंग्लिश नागरिकांनी तो शब्द an aranga असा समजला आणि कालांतराने त्यावेळी या फळांचे an Orange - ऑरेंज हे नांव इंग्लिश नागरिकांना प्रथम परिचित झाले. या फळांचा सुंदर रंग याच नावाने ओळखला जाऊ लागला. तोपर्यन्त या रंगाला yellow red अथवा reddish yellow असे संबोधित केले जात असे. नंतरच्या काळांत Orange या Noun (नाम) चा इंग्लिश शब्दकोशातला अर्थ असा लिहिला गेला. A bright reddish-yellow color, like that of the skin of rip orange. सोळाव्या शतकाच्या आधी या रंगाला geoluread असे नांव होते. याचा अर्थ, खोल जमिनीत सापडणाऱ्या yellow – red या नैसर्गिक मातीच्या मिश्रणाचा रंग असा आहे. या अद्भुत रंगसंस्कृतीचा असा इतिहास वाचताना आपणही असेच रंगून जातो.

वास्सीली कांडीन्स्की हा विसाव्या शतकाच्या मध्यावर जन्माला आलेला एक नामवंत रशियन चित्रकार. कालांतराने तो फ्रान्समधे स्थायीक झाला. Orange is Red brought near humanity by Yellow…!..असे त्याने एका वाक्यात केलेले ऑरेंज लाल – पिवळ्या या रंगांचे परस्पर नाते सांगणारे विश्लेषण अतिशय प्रबोधक आहे.

विज्ञाननिष्ठ अभ्यासानुसार, भगव्या रंगाच्या काही गुणवत्तांमधे थोडासा विरोधाभास आहे. एका बाजूला या रंगाची दृश्यमानता, अन्य रंगांच्या तुलनेत थोडी जास्त आहे. त्यामुळे आपल्या ध्वजावरील अथवा एखाद्या चित्रामधे हा रंग आपले लक्ष पटकन वेधून घेतो. एखादा इंटीरियर डिझायनर, दर्शकाचे लक्ष वेधून घेण्यासाठी अगदी थोड्या प्रमाणात या रंगाच्या अनुकूल गुणवत्तेचा वापर करतो. एखाद्या ऑफिसच्या मोठ्ठ्या हॉलमधे, स्वच्छतागृहाचा किंवा पँन्ट्रीचा एकच दरवाजा गडद ऑरेंज रंगात आपले लक्ष पटकन वेधून घेतो, ही या रंगाची अनुकूल गुणवत्ता. मात्र या रंगाची प्रतिकूल गुणवत्ता किंवा वैगुण्य असे की या रंगाची आपल्याला पटकन विस्मृती होते. यामुळेच कार्स, टेलीव्हीजन सेट अशा दीर्घकाळ टिकणाऱ्या वस्तूंसाठी हा रंग वापरला जात नाही.



^ भगवा / ऑरेंज या रंगाचे आयताकृती, भूमितीय प्रतीक चिह्न.

वेदकालीन सिंधू समाज प्राचीन प्रगत संस्कृतींमधे, अनेक रंगांचे तर्कसंगत भूमितीय आकार निश्चित केले गेले होते. प्रतीकशास्त्र अथवा चिह्नसंकेतानुसार, विषमभूज आयताकृती हे भूमितीय चिह्न, केशरी, भगव्या किंवा ऑरेंज रंगाचे प्रतीक आणि रूपक मानले गेले आहे. हा केशरी रंग, लाल

आणि पिवळा या दोन प्राथमिक रंगांच्या मिश्रणाने बनवला जातो. यांत लाल आणि पिवळ्या रंगाचा प्रभाव कमी अथवा जास्त झाला की या भागव्या रंगाचे वेगळे संकेत निर्माण होतात. लाल रंग नेहेमीच ऐहिक, लौकिक, सांसारिक किंवा पार्थिव म्हणजे वास्तवाच्या जवळचा समजाला जातो. मात्र याचा केशरी हा उपरंग मात्र ऊर्जा, प्रकाश, उत्साह आणि जोश अशा पारलौकिक आणि वैश्विक तत्वांचे प्रतीक मनाला गेला आहे. उबदार, प्रेमळ, मोहक, वेधक तरीही निश्चित – काटेकोर अशा संवेदना, प्रथम दर्शनी हा रंग निर्माण करतो. तीव्र, उत्कट, तामसी, उष्ण या लाल रंगाच्या संवेदना आहेत. याउलट; प्रसन्नता, उल्हास, समाधान, आनंद अशा संवेदना या केशरी रंगामुळे प्रसारित होतात. उगवतीच्या सूर्याच्या रंगाच्या स्नेह आणि मैत्र भावना अशा वैयक्तिक आणि सामाजिक संवेदनांची अनुभूती, हे या केशरी-भगव्या रंगाचे वैशिष्ट्य आहे. लाल रंगाचा प्रभाव जास्त असलेला केशरी रंग इच्छा, शरीर जाणीवा, अभिलाषा, प्रभुत्व, आक्रमकता आणि राष्ट्रप्रेम अशा संवेदनांचे प्रतीक आहे. पिवळ्या रंगाने प्रभावित असलेला केशरी रंग, हा देव्हाऱ्यातील दिव्यासारखा सौम्य प्रकशदायी म्हणजे दिप्तीमान आहे. याबरोबरच सोनेरी रंगाच्या जवळ जाणारा केशरी किंवा भगवा नेहेमीच बुद्धीवैभव, धनवैभव,  आणि उत्तम दर्जा अशा गुणवत्तांचे दृश्य संकेत देतो.

खगोलातील बुध ग्रह कुशाग्रबुद्धीचे प्रतीक आहे. हा केशरी रंग याच बुध - मंगळ या दोन ग्रहांचा आणि सूर्याचा, प्रतीक रंग आहे. रविवार, मंगळवार, बुधवार या आठवड्यातील तीन वारांचा हाच प्रतीक रंग आहे. वस्तुनिष्ठ दृष्टीने केशरी रंग; आनंदी-प्रसन्न-उर्जित-उत्साही-प्रभावी अशा व्यक्तीमत्वाचे वैशिष्ट्या आहे. व्यक्तीनिष्ठ किंवा तात्त्विक दृष्टिकोनातून; व्यक्तीचा आनंदी-गमत्या


स्वभाव, ज्ञान प्रचुरता, विपुलता, निरासक्त जीवनशैली, एखाद्या ज्ञानशाखेच्या अभ्यासाची आसक्ती अशा गुणवत्तांचे चिह्नसंकेत स्पष्ट होतात.

प्राचीन भारतीय संस्कृतीमधे मानवी शरीराचा आणि जीवनाचा मूलाधार असलेल्या सात कुंडलिनी चक्रांचा सखोल आणि विस्तृत अभ्यास मांडला गेला. सहस्रार-चक्र, आज्ञा-चक्र, विशुध्द-चक्र, अनाहत-चक्र, मणिपूर-चक्र, स्वाधिष्ठान-चक्र, मूलाधार-चक्र या सात चक्रांपैकी सहावे स्वाधिष्ठान-चक्र, याची जागा मानवी जननेंद्रियापाशी मानली गेली आहे. हेच स्वाधिष्ठान-चक्र व्यक्तीच्या प्रजनन क्षमतेचे आणि मैथुन या चार पैकी एका प्राथमिक गरजेचे नियंत्रण करते. पांढऱ्या कमळाच्या सहा शेंदरी अथवा केशरी पाकळ्यांमध्ये हे चक्र चिह्नांकित केले जाते.

प्राचीन भारतीय संस्कृतीमधे शरीर इच्छातृप्ती आणि प्रजननासाठी मैथुन म्हणजेच युगुलधर्म हे आवश्यक मानले गेले. या निरामय आणि शुध्द युगुलधर्माचे पावित्र्य आणि शरीर इच्छेचे नियंत्रण याचेही महत्त्व या अभ्यासात मांडले गेले. व्यक्तीचे आत्मभान म्हणजे वृत्ती आणि वासना म्हणजे चित्त या दोन्हीचे योग्य संयमित संतुलन ठेवण्याचे महत्वाचे काम, केशरी अथवा भगवे वस्त्र – परिधान वापरल्यामुळे साध्य होते. अशी सखोल आणि संपूर्ण, शरीरइच्छा नियंत्रण करण्याची, निरामय युगुलधर्माचे पावित्र्य आणि त्याची वैयक्तिक आणि सामाजिक आवश्यकता स्पष्ट करणारी स्वाधिष्ठान-चक्राची विज्ञाननिष्ठ संकल्पना, भगव्या रंगाच्या गुणवत्तेशी जोडण्याचे, आपल्या पूर्वजांचे हे काम फार विलक्षण आहे. आजही निरिच्छ – निरपेक्ष वृत्ती धारण करणाऱ्या आणि निरामय जीवनशैली स्वीकारलेल्या व्यक्ति, भगवी वस्त्र-परिधान


वापरतात. संयम-श्रद्धा-भक्ती-वात्सल्य-पावित्र्य-राष्ट्राभिमान-राष्ट्रप्रेम या भावना व्यक्त करताना केशरी आणि भगव्या रंगाचा प्रभावी वापर केला जातो.

जगातील अनेक देश आणि संस्कृतींमधे आपला भगवा म्हणजेच केशरी रंग विविध रूपे घेऊन वावरतो. बौद्ध धर्मप्रणाली स्वीकृत असलेल्या समाजातिल विनम्र आणि विनयशील वृत्तीचे बौद्ध भिख्खु नेहमी केशरी वस्त्र वापरतात. केशरी अथवा भगवे वस्त्र हा त्यांचा बाहेरच्या जगाशी होणारा निःशब्द संवाद आहे. चीनी आणि जपानी समाजात, केशरी रंग आपुलकी आणि आनंदाचे संकेत देतो. चौदाव्या शतकाच्या अखेरपर्यंत युरोपियन समाजात ऑरेंज या रंगाला येलो-रेड असे संबोधन वापरले जात असे. ख्रिश्चन धर्म संकल्पनेतील प्रोटेस्टंट प्रणाली स्वीकारणाऱ्या युरोपियन समाजाने, केशरी रंग पवित्र म्हणून प्रमाण मानला आहे. याच युरोपातील जर्मनी आणि रशियामधे केशरी - नारिंगी रंगाचे संत्रे अथवा ऑरेंज फ्रुट, आजही चायनीज ॲपल या संबोधनाने लोकप्रिय आहे. थायलंड या देशातील समाजात ऑरेंज हा रंग गुरुवार या दिवसाचा रंग मानला जातो. ऑरेंज रंगाचे परिधान आठवड्यातील गुरुवारी वापरणे ही थायलंड मधील प्राचीन परंपरा आहे.



^ आयर्लंड देशाचा ध्वज.

आयर्लंड या ब्रिटीश राजसत्तेचा भाग असलेल्या देशाचा ध्वज थोड्या फार फरकाने, भारतीय तिरंग्याशी रंगांचे साधर्म्य दाखवतो. भारतीय तिरंग्याचे रंग आडवे आहेत, आयरिश ध्वजाचे तेच तीन रंग उभे आहेत. या मागे काही ऐतिहासिक घटनाक्रम आहे. आयरिश ध्वजातील हिरवा रंग कॅथोलिक ख्रिश्चन धर्म प्रणालीचा संकेत देतो. यातला केशरी रंग प्रोटेस्टंट ख्रिश्चन धर्म प्रणालीचा संकेत आहे. काही शतकांपूर्वी एकाच धर्मातील या दोन प्रणालींमधे फार मोठा हिंसक संघर्ष झाला होता. त्यावेळी शांतता निर्माण करण्यासाठी या दोन रंगाच्यामधे पांढऱ्या रंगाचा पट्टा वाढवून नवा ध्वज निर्माण झाला.




^ न्यूयॉर्क शहराचा ध्वज.

या भगव्या रंगाचे काही शतकांपूर्वीच्या अमेरिकेशी जुळलेले नाते समजून घेणे खूप रंजक आहे. आजच्या हॉलंड देशातील स्थलांतरित डच लोकांनी तत्कालीन अमेरीकेमधे, १६२५ सालांत, न्यू ॲमस्टरडॅम या नावाने एक शहर वसवले होते. हेच आजचे जगप्रसिद्ध न्यूयॉर्क शहर. त्यावेळच्या डच युवराजाच्या ध्वजाची प्रतिकृती वापरून न्यूयॉर्क शहराचा ध्वज निर्माण झाला होता. या ध्वजावर, निळा – पांढरा – केशरी अशा तीन रंगाचे उभे तीन पट्टे आहेत. आजही ऑरेंज अथवा केशरी रंग हा डच समाजाचा आवडता रंग आहे. कालांतराने त्या शहराचे न्यूयॉर्क असे नामकरण झाले आणि पुढे शहराचे


मानचिह्न या ध्वजाच्या पांढऱ्या पट्ट्यावर अंकित झाले. मात्र मूळ डच ध्वजाचा प्रभाव तसाच राहिला.






^ केशरी रंगाची मधुर-रसाळ जिलेबी. ^ कर्नाटकातील केशरी भात

जगभरातील रसना संस्कृतीशी या केशरी रंगाचे जवळचे नाते आहे. कर्नाटकात प्रसिध्द असलेला "केसरी भात", खास भारतीय "जिलेबी", "गाजराचा हलवा" या भारतीय रसना कृतींसह, संत्रे आणि कलिंगड ही फळे, चविष्ट सामन मासा आणि चमचमीत खेकडा किंवा झिंगा, स्वीट पोटॅटो अशा केशरी रंगाच्या अनेक शाकाहारी आणि मांसाहारी रसनाकृती जगभरातील खवय्यांची रसना तृप्ती करत आहेत.






^ भगवा आणि नारिंगी छटा

ऑरेंज – भगवा – केशरी – नारिंगी – शेंदरी या भारतीय नावांनी सुपरिचित रंगाच्या अनेकानेक छटा, विविध संबोधनानी जगभर ओळखल्या जातात. अशी संबोधने अथवा नावे, त्या रंगाच्या उपयोगाच्या - वस्तूच्या – फळांच्या संदर्भाने वापरली जातात. त्यातील प्रत्येक नांव आपल्या परिचयाचे असते. अंबर, ॲप्रीकॉट (ओला जर्दाळू), गोल्ड, रस्ट (लोखंडाचा गंज), टॉमेटो, पंपकिन (लाल भोपळा), कॅरट (गाजर), बर्न्ट (खमंग भाजलेला पदार्थ), फ्लेम, सनसेट, टी रोझ आणि ब्राईट अशा असंख्य छटा ही या केशरी रंगाची जगभरातली किमया आहे.

या केशरी-भगव्या रंगातील परीधानात न्हाऊन निघालेल्या नागरिकांच्या उपस्थितील देशभरातील प्रचंड सभा, फडफडणारे असंख्य भगवे ध्वज, तत्कालीन प्रस्थापितांना अन्यायाविरुद्ध जाब विचारण्यासाठी लढणाऱ्या, भगवी वस्त्रे धारण करणाऱ्या साध्वी आणि भगव्या वस्त्र – परीधानात समाजाचा आत्मसन्मान जागृत ठेवणारे, नागरिकांना ऊर्जा देणारे नवे योगी राजकारणी...!!...या विशाल भगव्याला आपले दंडवत आणि त्याच्या यशासाठी अनेकानेक शुभेच्छा...!!

--00—




# खानदानी, विलासी रंग जांभळा.

विद्वान, व्यासंगी, गंभीर अशा आपल्या खऱ्या व्यक्तिमत्वाने समाजात प्रभाव पाडणाऱ्या आणि तसे असल्याचा आव आणून तसा देखावा निर्माण करणाऱ्या अशा दोन्ही प्रवृत्तींच्या लोकांना जांभळा रंग प्रिय असतो. सत्ता, खानदानी उमदेपणा, विलासी वृत्ती आणि महत्वाकांक्षा असे नैसर्गिक गुणधर्म आणि अशा प्रवृत्ती अनेक व्यक्तींमधे दिसून येतात. एखाद्या व्यक्तिमत्वातील या सर्व गुणवत्ता आणि सर्व वैगुण्य याचे रूपक आणि प्रतीक म्हणजे आपला जांभळा रंग. हा रंग बराचसा राजस वृत्तीचा आहे. मात्र या बरोबरच आपल्या सावलीचा रंग म्हणून काहीसे गूढ स्वरूपाचे संकेत सुद्धा हा रंग देत असतो. काही संस्कृतींमधे शोक व्यक्त करताना याचा वापर केला जातो.

निळा आणि लाल या दोन प्राथमिक रंगांच्या मिश्रणाने जांभळा रंग तयार होतो. लव्हेंडर - पर्पल – लायलॅक – व्हायोलेट अशा इंग्लिश नावानी सुद्धा जांभळा रंग आपल्याला परिचित आहे. निळया रंगाच्या स्थैर्य आणि धृडता आणि लाल रंगाची ऊर्जा या दोन्ही गुणवत्तांचे संतुलन जांभळया रंगात दृश्यमान होते.

सर्वच रंगांच्या नैसर्गिक व्यक्त संवेदना नेहेमीच परस्पर विरोधी संकेतांची अनुभूती देत असतात. जांभळा रंगही याला अपवाद नाही. मात्र “पिंडे पिंडे मतिर्भिन्न:” या उक्ती प्रमाणे हे संकेत व्यक्तीनिष्ठ असतात. विपुलता – समृद्धी – श्रीमंती यासह व्यक्तीचा अनावश्यक खर्च करणारा उधळया स्वभाव, याचा परिचय या रंगामुळे निश्चितपणे मिळतो. चातुर्य – बुद्धीमत्ता – प्रतिष्ठा – स्वतंत्र

विचार क्षमता – सृजनशील निर्मिती – अनाकलनीय गूढ स्वभाव आणि मोहक आणि आकर्षक व्यक्तिमत्व, अशा अनेक व्यक्तींच्या विविध स्वभाव वैशिष्ट्यांचा परिचय, जांभळ्या रंगामुळे होत असतो. याचे कारण असे की अशा स्वभावधर्माच्या – अशा प्रवृत्ती निसर्गतः धारण करणाऱ्या व्यक्तींना हा जांभळा – पर्पल - लायलॅक – व्हायोलेट रंग नेहेमीच पसंत असतो, त्यांच्या परीधानात याचा थोडासा परिचय मिळतो.



< ओव्हल: जांभळ्या रंगाचे भूमितीय चिह्न – प्रतीक.

लंबवर्तुळाकार म्हणजेच ओव्हल आकार हे जांभळ्या रंगाचे भूमितीय चिह्न अथवा प्रतीक, प्राचीन विद्वान गणितीनी निश्चित केले आहे. या रचनेला काही विज्ञाननिष्ठ आधार आहे. व्यापक आणि मोकळ्या निळ्या रंगापेक्षा याचा व्यक्त आणि दृश्य अविष्कार अनेकदा गूढ जटील संवेदनांचे संकेत देतो. आपल्या दृष्टीला हा रंग सौम्य – प्रवाही दिसतो मात्र याच्या कोन विरहित आकारामुळे आपली नजर याच्यावर स्थिर होत नाही. मूळ रंगाची वैशिष्ट्ये आणि अंडाकृती - ओव्हल भूमितीय आकार या दोन्हीच्या समानतेची घातलेली अशी सांगड फारच लक्षणीय आहे.

तुम्ही स्वतः जर या जांभळ्या रंगाचा नियमित वापर करत असाल तर तुमचे खास व्यक्तिमत्व आणि त्याचे शब्दचित्र असे असेल. जांभळा रंग

आवडणाऱ्या व्यक्ति चांगल्या जीवनसाथी असतात. अशा व्यक्ति, लाल रंगासारख्या भडक आणि आक्रमक नसतात आणि निळया रंगाप्रमाणे सौम्य आणि साध्याही नसतात. अशा व्यक्तींचा नेहमी राजस गुणाकडे जास्त कल असतो. मात्र अशा व्यक्तींबद्दल पटकन गैरसमज होण्याची शक्यता असते त्यामुळे त्यांना नेहेमी सतर्क राहावे लागते. बऱ्याचदा अशा व्यक्ति आळशी आहेत असा समज होतो. हलका जांभळा रंग आवडणाऱ्या व्यक्ति शृंगारिक प्रवृत्तीच्या असतात. मात्र खूप गडद जांभळा रंग आवडणाऱ्या व्यक्ति निराशावादी असल्याचे जाणवते. किशोर वयाच्या आधीच्या साधारण ७५ टक्के मुलांना हलका जांभळा रंग पसंत असतो. महिला वर्ग आणि छोट्या मुलाना आकर्षित करणाऱ्या उत्पादनाच्या जाहिरातीत लव्हेंडर – पर्पल - लायलॅक – व्हायोलेट  अशा जांभळ्या रंगाच्या छटा जास्त प्रमाणात वापरलेल्या दिसतात.




< कॅडबरी >




महिलावर्गात लोकप्रिय असलेला हॉलमार्क हा सोन्याच्या दागिन्यांचे मानांकन करणारा जागतिक ब्रँड आहे. लहान – थोर सगळ्या वयोगटाला, विशेष करून लहान मुलांचा आवडता चॉकोलेट ब्रँड कॅडबरी. या दोन्ही जगप्रसिध्द व्यवसायाचे मानचिह्न अथवा लोगो जांभळ्या रंगाच्या पर्पल छटेत आहेत. कॅडबरी ब्रँडच्या जगभरातील बहुतांशी उत्पादनांच्या वेष्टनाचा रंग हाच आहे, हे लक्षात घ्यायला हवे.

खगोलातील ज्युपिटर म्हणजेच गुरु ग्रह, राशीचक्रातील धनु राशी, आठवड्यातील गुरुवार हा दिवस, या सर्वांचे हा जांभळा रंग प्रतीक चिह्न आहे. या रंगाबद्दल वस्तुनिष्ठ अथवा हेतुपूर्वक, वास्तव विचार करताना वेगवेगळ्या व्यक्तींमधील; रुबाबदार, गर्विष्ठ, उग्र, खिन्नता, गूढता, अशा विविध गुणवत्ता आणि वैगुण्यांची अनुभूती होते. याचवेळी व्यक्तीनिष्ठ गृहीतकांचा पगडा असलेल्या या जांभळ्या रंगामुळे, एखादी व्यक्ति निराश अथवा एकाकी असल्याची भावना निर्माण होते.






^ राजा – राणीचा मुकुट ^ हॉलमार्क लोगो

लेबेनॉन मधील टायर बंदरातिल समुद्रात सापडणाऱ्या समुद्री जीवांपासून हा जांभळा रंग फेनिशिया मधील लोकांनी सोळाव्या शतकात बनवला. मात्र त्याकाळात दुर्मिळ असल्याने तो खूप जास्त किमतीला विकला जात असे. काही शतकांपूर्वी, कपड्यांसाठी जांभळ्या रंगाचे नैसर्गिक रंगद्रव्य बनविणे खूप खर्चिक होते. यामुळेच जांभळ्या रंगाचे कपडे वापरणे फक्त राजघराण्यातील व्यक्ति आणि धनिक कुटुंबातील लोकांनाच शक्य होत असे. यामुळे हा रंग राजे-राण्या, वैभव, श्रीमंती आणि सत्ता अशा संकेतांशी

साहजिकपणे जोडला गेला. आपले श्रेष्टत्व – अधिकार – रुबाब याचे दर्शन प्रजेला व्हावे यासाठी तत्कालीन रोमन साम्राज्यात, या रंगाचे परिधान वापरले जात असे.

गहन-गंभीर आणि सौम्य अथवा मृदू अशा परस्परविरोधी स्वभावधर्माचा हा रंग, निव्वळ त्याच्या दर्शनाने आणि सानिध्याने असे वातावरण निर्माण करतो. धुंद, थंड आणि गडद मानसिकतेची अनुभूती देतो. वस्तुनिष्ठ व्यक्ततेत अधिकार-वैभव-गूढता अशा भावना परावर्तीत करतानाच व्यक्तीनिष्ठ अनुभवात हा रंग एकाकीपण आणि निराशा व्यक्त करतो.




^ चीन मधील टेराकोटा आर्मी

सर्वच रंगांच्या अनेक छटांचे विविध संकेत, विविध संस्कृती आणि देशात वापरले गेले. जांभळा रंगही याला अपवाद नाही. किन शी हुआंग हा चीनचा पहिला राज्यकर्ता सम्राट. ख्रिस्तपूर्व दोनशे वर्षांपूर्वी याचा मृत्यू झाला. ९८ चौरस किलोमीटर इतक्या भव्य परिसरात पसरलेल्या याच्या दफन स्थळावर त्याच्या कबरीच्या चारी बाजूनी, भाजक्या-पक्क्या मातीचे बनवलेले हजारो

सैनिक रचले गेले. हे सैन्य मृत्युपश्चात सम्राटाचे रक्षण करेल अशी समजूत आणि श्रद्धा, या मागे होती. ख्रिस्तपूर्व पाचव्या शतकात, निसर्गात उपलब्ध झाडे-फुले-फळे-मातीपासून जांभळा रंग बनविण्याचे तंत्रज्ञान चीनमधे विकसित झाले होते. १९७४ मधे अचानक सापडलेल्या या जागतिक वारसा स्थळावर, सम्राटाचे हे सर्व अंदाजे आठ हजार मातीचे सैनिक, रथ, घोडे अशा जांभळ्या रंगाच्या छटेत रंगवले गेले होते. चीनी संकेतानुसार जांभळा रंग ध्रुव ताऱ्याचे प्रतीक असून ती सम्राटाच्या राजवाड्याची जागा मानली गेली होती. पौर्वात्य देशात आजही जांभळा रंग शोक व्यक्त करण्यासाठी वापरला जातो. जॉर्ज वॉशिंगटन या अमेरिकेच्या पहिल्या अध्यक्षांनी, सैनिकांना दिलेले पहिले शौर्य पदक हृदयाच्या आकाराचे होते आणि ते पर्पल रंगाच्या फितीवर अंकित झाले होते म्हणून त्या शौर्य पदकाला "पर्पल हार्ट" असे संबोधित केले गेले. काही प्रदेशात बौद्ध धर्म बांधव जांभळा रंग पवित्र मानतात.




^ बैंगनी छटा.




^ इंडिगोफेरा प्लांट

निळा आणि जांभळा या दोन्ही रंगाच्या खूप जवळ असणारी रंगाची ही इंडिगो छटा. इंडिगोफेरा या वनस्पति पासून ही रंग छटा बनवली जाते. वर्ष १६७१ मधे न्यूटनने या रंग छटेचे वर्णपटातील (Spectrum) अस्तित्व सिद्ध केले.



^ जांभळा रंग गडद छटा



^ जांभळा रंग हलक्या छटा

जांभळ्या रंगाच्या अनेक छटा आपल्याला अनेक नावानी परिचित आहेत. बैंगनी, आमेथिस्ट, लायलॅक, मोव्ह, व्हायोलेट, प्लम, लव्हेंडर, वस्टेरिया, इंडिगो, आयरीस, फुशिया, एगप्लांट, टायरीयन, रॉयल, ईम्पीरियल, हिलीयोट्रोप, मेजंटा, मलबेरी, मार्डी ग्रास अशा जांभळ्या रंगाच्या असंख्य छटांचे विभ्रम, जगभरातले रसिक अनुभवत असतात. मला खात्री आहे, पर्पल रंगातल्या त्या जगप्रसिध्द चॉकोलेटची मिठ्ठास चव , हा लेख वाचून तुमच्या जिभेवर नक्की रेंगाळली असणार...!!

--00--



पर्पल By Cloud Monet

Waterloo Bridge – Lost in Translation

# कृष्णवर्ण रंग काळा

हा काळा रंग नक्की काय आहे...!!..शुभ की अशुभ...मंगल की अमंगल...उत्साह की निराशा...आनंद की दुखः...अधिकार की वर्चस्व...!!!..रंगांच्या जगात, सर्वात जास्त परस्पर विरोधी संकेत देणारा हा भारतीयांचा आवडता रंग... कृष्णवर्णी काळा. या काळ्याभोर रंगाचे एवढे परस्पर विरोधी संकेत, कुठल्याही अन्य रंगाला जोडले गेलेले नाहीत. अमंगल, दुखःदायी, हिंसक अशी ओळख असलेला पाश्चात्य जगातला काळा रंग, भारतीयांसाठी ऊर्जादायी, मंगलकारक आणि श्रद्धा – भक्तीचा पूरक रंग असतो.


< काळी - सावळी विठ्ठल + रखुमाई.

दत्ताराम गाडेकर यांचे संगीत, गोविंद पोवळे आणि प्रभाकर नागवेकर यांचे स्वर...यात सजलेली ही विष्णुदास नामदेव महाराज या संत-महात्म्याने रचलेली सुंदर गौळण आपण सर्वांनी ऐकली असेल. (संत ज्ञानेश्वर यांचे समकालीन संत नामदेव वेगळे). ‘विष्णुदास नाम्याची स्वामिनी काळी, कृष्णमुर्ती बहु काळी गो माय...यमुना जळ बहु काळी वो माय...बुन्थ काळी बिलवर काळी, गळामोती एकावळी काळी गो माय’...!!..भारतीय संस्कृतीत

आणि मराठी भक्तीमार्गी परंपरेत अंधार, रात्र आणि काळा रंग याची ही अनपेक्षित विलक्षण मांडणी. काळ्या रंगाची चिह्नसंकेतातील अशी द्वयार्थी भावार्थ मांडणी या दृष्टीने जगात एकमेवाद्वितीय असावी. गौळणींच्या हंड्यातील दही–लोणी पळवणारा माखनचोर नटखट बाळकृष्ण इतका काळा आहे की त्याच्या काळ्या सर्वांगावर माखलेल्या दह्यामुळे त्याला दह्यांग म्हटले गेले. पंढरपुरात विटेवर उभा असलेला काळा-सावळा पांडुरंग, शतकानुशतके वारकऱ्यांचे श्रद्धास्थान बनला आहे.

तमसो मा ज्योतिर्गमय। या सर्वमान्य मार्गदर्शक सुभाषिताप्रमाणे प्राचीन भारतीय संस्कृत साहित्यात या अंधाराचा, या काळ्या रात्रीचा  उल्लेख सातत्याने केला गेला. भारतीय संकल्पने प्रमाणेच, प्रकाश म्हणजे अंधाराचा नाश - प्रकाशाचा अभाव म्हणजे अंधार अशी संकल्पना वैश्विक सत्य म्हणून जगभरातील प्रत्येक संस्कृतीमधे स्वीकारली गेली आहे.

भारतदेशा पलीकडच्या पाश्चिमात्य आणि पौर्वात्य संस्कृतींमध्ये काळा रंग सामान्यतः; दुखः, हिंसा, मृत्यू, विषाद, खिन्नता, अशुभ, अमंगल, गौप्य आणि गुप्तता, दिशाभूल या संदर्भात वापरला जातो. त्याचवेळी औपचारिक, प्रतिष्ठीत, रुबाबदार रंग म्हणूनही हा स्वीकृत आहे. सर्वच रंगांचे असे परस्पर विरोधी गुणधर्म प्रदेशागणिक आणि संस्कृतीमधे प्रचलित आहेत, काळा रंग याला अपवाद नाही. आहार-निद्रा-भय-मैथुन या प्रत्येक सजीवाच्या अगदी प्राथमिक गरजा आहेत. यातील एक, अज्ञाताची भीती ही भावना रात्रीच्या अंधारात प्रत्येक सजीवाच्या मनात निसर्गतः निर्माण होतेच. नेमकी हीच भीती काळ्या रंगाच्या वैशिष्ट्याचा एका भाग बनली असावी.

काळ्या रंगाचा वापर, नकारात्मक कारणासाठी अनेक ठिकाणी केला जातो. गमत्या स्वभावाची व्यक्ति काही चुटकुले, जोक सांगून आपले मनोरंजन करते, याला ह्युमर असे इंग्लिश संबोधन आहे. मनोरंजना ऐवजी यात निंदा-नालस्ती आणि नकारात्मक संदर्भ आला की त्याला ब्लॅक ह्युमर असे म्हटले जाते. नापसंतीची आणि नापासांची यादी म्हणजे ब्लॅक लिस्ट असते. युरोपमधे चौदाव्या शतकांत, संसर्गजन्य रोगाच्या खूप मोठ्या साथीने अगणित नागरिकांचा मृत्यू झाला होता. त्या साथीत झालेल्या मृत्यूला ब्लॅक डेथ असे संबोधले गेले. राक्षसी-पाशवी वृत्ती, चेटकीण-चेटूक आणि अघोरी विद्या याला ब्लॅक मॅजिक असे संबोधित केले जाते. काही कामासाठी निघाल्यावर, काळ्या मांजराचे दर्शन अशुभ आणि अमंगल असते अशी अंधश्रद्धा आजही जगभरातील सर्व समाजात प्रचलित आहे. मात्र याचवेळी, युरोप आणि पाश्चिमात्य संस्कृतीत, पुरुषांचे काळ्या रंगाचे जाकीट आणि टाय, कणखरपणा आणि अधिकार याचे प्रतीक मानले गेले. कॉर्पोरेट जगात आता स्त्रिया सुद्धा त्यांचा अधिकार दर्शवण्यासाठी, असे रुबाबदार काळे जाकीट आणि टाय याचा वापर आग्रहाने करतात.





^ पुरुष आणि महिलांचे काळे जाकिट

एखाद्या चित्रकाराला, सपाट पृष्ठभागावर द्विमिती चित्रात वस्तूची घनता दृष्टीमान करण्याचे कसब, याच काळ्या रंगाच्या वापराने साध्य होते. अनुभवी आणि कसबी छायाचित्रकार याच कृष्ण + धवल रंगाच्या हजारो छटांतून, दर्शकाशी नि:शब्द संवाद करत असतो. चित्रांचे आणि छायाचित्रांचे एखादे प्रदर्शन निरखून पाहिले तर त्या चित्रांनां उठावदार बनवण्यासाठी पार्श्वभूमीवर केलेला काळ्या रंगाचा वापर आपल्या सहज लक्षात येतो. काळ्या रंगाची पार्श्वभूमी, खुल्या चमकदार अशा लाल आणि केशरी रंगाना अधिक तेजस्वी बनवते. या रंगाचा योग्य वापर करून, किमती मोटारगाड्या, स्मार्ट फोन, पुरुषांचे शेवर, स्त्रियांच्या चामड्याच्या पर्स, काळ्या रंगातील स्त्री – पुरुषांची परिधाने अशी उत्पादने जगभर खूप यशस्वी झाली आहेत.



< काळी शनी देवता.

जगातील बहुतांश संस्कृतींमध काळा रंग शनी ग्रह, आठवड्यातील शनिवार, वृश्चिक आणि मकर रास या सर्वांचे प्रतीक मनाला गेला आहे. या

रंगाच्या वस्तुनिष्ठ मांडणी मधे मात्र वैविध्य आहे. पाश्चिमात्य देशात विशेष करून ख्रिश्चन धर्म प्रणाली मधे काळा रंग अमंगल, अशुभ, अनिष्ट, धोकादायक, भीतीदायक आहे, मृत्यू आणि निराश मनस्थितीचा कारक मानला गेला आहे. या उलट प्राचीन भारतीय संस्कृतीत हा रंग शुभकारक, ऊर्जादायी आणि श्रद्धेय म्हणून स्वीकृत आहे. सूर्याच्या उत्तरायण काळात म्हणजे संक्रांतीच्या सणाचे वेळी, महिला आणि पुरुष काळ्या रंगाची वस्त्र – परिधान वापरतात. केरळातील शबरीमला डोंगरावरील अय्यप्पाच्या मंदिरात दर्शनाला जाणारे श्रद्धाळू पुरुष, काळ्या रंगाची लुंगी अथवा धोतर आणि कुडता वापरतात. या वेळी साधारण ४४ दिवस ब्रह्मचार्याचे पालन करण्याचा प्रघात आहे.

व्यक्तीनिष्ठ विचार धारणेत, विज्ञाननिष्ठ भारतीय संस्कृतीत हा रंग ऊर्जादायी आहे. या उलट ख्रिश्चन धर्म प्रणालीत, काही अभाव आणि कमतरतेची जाणीव देणारा, देवाने प्रकाशाची निर्मिती करण्याच्या आधीचा जगाचा हा रंग फारसा लोकप्रिय नाही. पाश्चिमात्य जगांत काळा रंग कुटुंबियांच्या मृत्यूपश्चात शोक व्यक्त करण्यासाठी वापरला जातो. प्राचीन इजिप्शियन संस्कृतीत काळा रंग फार वेगळ्या कारणासाठी सकारात्मक म्हणून स्वीकारला गेला. प्राचीन इजिप्तमधे मृत्यू नंतर राजे-राण्यांच्या शवाचे, ममी स्वरूपात दफन केले जात असे. अशा वेळी पाताळातील दुष्ट – अमंगल शक्तींपासून अनुबिस नावाची देवता काळ्या कोल्ह्याच्या रूपांत या शवांचे रक्षण करते अशी श्रद्धा लोकमानसात दृढ होती.

आपल्या देशाच्या आर्थिक व्यवहारात आणि राजकारणात, काळा पैसा...अर्थात ब्लॅक मनी या संबोधनाचा वापर आपापल्या फायद्यासाठी

नियमितपणे केला जातो. या संबोधनातला काळा रंग हा संदर्भ, करचुकव्या नागरिकांनी अवैध मार्गाने मिळवलेल्या आणि लपवून ठेवलेल्या पैशांसाठी वापराला जातो. या बरोबरच बेकायदेशीर व्यवसाय आणि व्यवहार यांना काळे धंदे या संबोधनाने हिणवले जाते. काळा आणि लाल या दोन्ही रंगाचा एकत्र वापर, परंपरेने अशुभ मानला गेला आहे. आजही या रंगाचा, उत्पादनाच्या जाहिरातीसाठी केला जात नाही. जगाच्या इतिहासातील विसावे शतक नाझी जर्मनीच्या हिंसाचाराने प्रभावित झाले होते. ते अत्याचार वाचून आजही प्रत्येकाचा थरकाप होतो. एक योगायोग असा की या नाझी राजवटीचे चिह्न, लाल चौकोनाच्या पार्श्वभूमीवर काळे स्वस्तिक अशा प्रकारचे होते. नाझी जर्मनीच्या संपूर्ण विनाषानंतर आज हे चिह्न अशुभ – अमंगल याचेच प्रतीक झाले आहे.



^ नाझी चिह्न

मनुष्य जातीच्या अनेक वंशांच्या व्यक्तींचे त्वचेचे, गोरा – गव्हाळ – पीत – कृष्ण असे निसर्गदत्त वर्ण आहेत. गेल्या शतकांत यातल्या कृष्णवर्णी लोकांना काळे ... ब्लॅक हे तुच्छता दर्शक संबोधन वापरले गेले. हे संबोधन त्यांच्या काळ्या वर्णामुळ हीन दर्जाची व्यक्ति असा अर्थाने वापरले जात असे. आज ही वर्ण भिन्नता आणि कृष्णवर्णी समाजाला मिळणारी दुय्यम वागणूक याचे उच्चाटन झालेले दिसते. मात्र भारतीय समाजात दोन अनिष्ट प्रथा आजही प्रचलित आहेत. आपल्याला कृष्णवर्णी बायको नको, उजळ रंगाचीच हवी

अशी अपेक्षा धरून वधूपरीक्षा करणारे लग्नाळू, आपल्या समाजात आजही ही अंधश्रद्धा बाळगून आहेत. परदेशी कंपन्यांनी आपली उत्पादने विकली जावी म्हणून काळया वर्णाला एका आठवड्यात उजळ बनविणाऱ्या, आपल्यावर लादल्या जाणाऱ्या उत्पादनांच्या जाहिराती...अशा या दोन अनिष्ट प्रथा.





< मंगळसूत्र

काळया मण्यांचे मंगळसूत्र हा विवाहित स्त्रिचा अलंकार भारतीय संस्कृतीत पवित्र – मंगलकारक आहे आणि तो विवाहित दंपतीच्या दीर्घायुष्याचे रूपक आहे. छोट्या बाळाची काळजी घेणारी आई अंघोळ झाल्यावर, कोणाची नजर लागु नये म्हणून त्याला रोज काळी तीट लावते. पाच महिन्याचा झाल्यावर त्याच्या कमरेला काळया दोऱ्याचा करगोटा बांधते. संध्याकाळी काळया मोहरीच्या दाण्यांनी त्याची दृष्ट काढते. या सर्व परंपरांच्या मुळाशी काळा रंग निगडीत आहे. अमंगल – अशुभ शक्तींपासून बाळाचे रक्षण करणे अशी निश्चित श्रद्धा या दीर्घ परंपरेला जोडलेली आहे.

विविध संस्कृतीतील, विविध धर्म प्रणालीतील अशा अनेक भावना – श्रद्धा – संकल्पना धारण करणारा...दिवसाच्या चोवीस तासातील रात्रीचे बारा तास आपली सोबत करणारा, अन्य कोणत्याही रंगांपेक्षा आपल्या दैनंदिन जीवनात व्यापक उपस्थिती असलेला भारतीयांचा आवडता कृष्णवर्ण काळा रंग...!!..जगाच्या अंतापर्यंत आपली सोबत निश्चितपणे करणार असतो...!!..

--00--

# स्वच्छ सकारात्मक पांढरा

इसका खमीझ मेरे खमीझसे सफेत कैसा...!! अशी दर्शकाच्या मनात उत्सुकता निर्माण करणारी, एका कपड्याच्या साबणाच्या जाहिरातीमधील ही एक गाजलेली कॅच लाईन. माझ्यापेक्षा याचा कुडता इतका पांढराशुभ्र कसा...!!..पांढऱ्या रंगाचे वस्त्र-परिधान वापरणाऱ्या व्यक्तीबद्दल अशी उत्सुकता किंवा थोडीशी असूया, थोडासा मत्सर  दर्शकाच्या मनात निर्माण करणारी, ही पंचवीस वर्षांपूर्वी गाजलेली यशस्वी जाहिरात. अशी उत्सुकता आणि असूया निर्माण होण्याचे कारणही तसेच आहे. पांढरा रंग वापरणारी व्यक्ति साधारणपणे सकारात्मक असते आणि दिसते सुद्धा. याच बरोबर त्याचा आत्मविश्वास आणि संतुलित व्यक्तिमत्वाची जाणीव सुद्धा, आपल्या नकळत आपल्याला होते. हीच पांढऱ्या रंगाची व्यष्टी आणि वैशिष्ट्ये आहेत. मात्र अशी व्यक्ति अती चोखंदळ आणि सहजासहजी समाधान मानणारी नसते.






^ पांढरा गणवेष

आपल्या रंगगाथेचा हा आठवा लेख. काळ्या रंगासारखाच आपले दैनंदिन जीवन व्यापून राहिलेला रंग पांढरा. सकाळी हातात येणारे वर्तमानपत्र, त्याआधी आपल्या कॉफी किंवा चहातले दूध आणि साखर (काहीना वर्ज असेल कदाचित), काही लिहिण्यासाठी हातात घेतलेला वहीचा कागद...आपल्या प्रत्येकाची सकाळची सुरुवात अशी पांढरीशुभ्र होत असते. काळी रात्र संपून नव्या दिवसाची सुरुवात म्हणजे पांढरा रंग. काळ्या पाटीवरची जुनी अक्षरे पुसून पांढऱ्या खडूने नवी अक्षरे लिहिणारा प्रसन्न - सकारात्मक म्हणजे पांढरा रंग. वेगवेगळे रंग, दर्शकाच्या मनात विविध भावना निर्माण करतात. पांढरा रंग अशा काही भावना निर्माण करत नाही. मात्र पांढऱ्या रंगाच्या

## काळ्यावर पांढरे

विषमता या एका गुणधर्मामुळे, अन्य रंगांच्या रिकाम्या पार्श्वभूमीवर आपले विचार व्यक्त करण्याचे, तो एक नैसर्गिक साधन आहे. कॉम्प्युटर आणि स्मार्टफोनचा वापर करतांना, अगदी छोट्या पडद्यावर गडद रंगांच्या पार्श्वभूमीवर लिहिले जाणारे आणि वाचले जाणारे पांढऱ्या रंगातील मेसेज, हे या विषमतेचा अनुभव आपल्याला निश्चितपणे देतात. थोडक्यात पांढरा आणि काळा यांची जोडी अविभाज्य आहे, एकमेकांशिवाय त्यांचे अस्तित्व आणि त्यांच्या शिवाय आपल्या दृष्टीच्या जाणीवा जागृत होणार नाहीत. याचे अगदी साधे उदाहरण म्हणजे डोळ्याच्या डॉक्टरांचा पांढऱ्या रंगावरील काळ्या अक्षरांचा तक्ता. चष्म्याचा नंबर तपासताना नेमके हेच दोन रंग आपल्या दृष्टी क्षमतेची परीक्षा करतात.






^ पांढरे वेष्टण. ^ डोळे तपसायचा तक्ता

विविध ज्ञानशाखांचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थांना आपण एक प्रश्न विचारूया. पांढरा आणि काळा हे दोन्ही रंग आहेत कां...?!?..याला उत्तर देताना भौतिक शास्त्राचा विद्यार्थी म्हणेल, काळा हा रंग नाही कारण तो आपल्या डोळ्यातील प्रकाश पूर्णपणे शोषून घेतो. पांढरा हा रंग आहे कारण तो स्पेक्ट्रम म्हणजे वर्णपटातील सर्व रंग आपल्या डोळ्यांना परावर्तीत करतो. चित्रकलेचा विद्यार्थी सांगेल काळा हा रंगच आहे कारण कितीही गडद असला तरी त्यावरून थोडासा प्रकाश परावर्तीत होतोच. विज्ञानाचा चिकित्सक विद्यार्थी सांगेल...प्रथम त्या रंगांचे माध्यम वस्तू आहे की प्रकशाचा किरण आहे ते बघूया. त्यानंतर तो प्रसारित कसा झालाय ते पहाणे महत्वाचे. त्यानंतर आपल्या डोळ्यांना रंग कसा दिसतो त्याचे विश्लेषण करणे आवश्यक आहे...!!..रसायन शास्त्राचा विद्यार्थी छातीठोक पणे सांगेल, काळा हा रंगच आहे. थोडक्यात, या दोन रंगांविषयी विविध विज्ञाननिष्ठ मतप्रवाह वाचणे फार रंजक अनुभव असतो हे मात्र खरे.

पांढऱ्या रंगाचे एक वैशिष्ट्य असे की तो वर्णपटातील सर्व रंगांचे संतुलन सांभाळतो. निष्पक्षता, वाजवीपणा, औचित्य, तटस्थ वृत्ती आणि स्वतंत्र विचार ही सर्व आपल्या पांढऱ्या रंगाची गुणवत्ता आहे. जन्माला आलेल्या बाळाला, जन्मतः फक्त पांढरा रंग बघण्याची क्षमता असते. वर्णपट आणि त्यातील रंग याचा परिचय त्या बाळाला अनुभवाने होत जातो. याचे अन्य वैशिष्ट्य असे की हा चिंतनशील आणि परावर्तक रंग आहे. याची पारंपरिक ओळख स्पष्ट, निष्कपट आणि निर्मळ रंग अशी आहे. मात्र वर्तमानकाळात याचा विपर्यास झालेला आपल्याला दिसतो. देशातील राजकारणी सतत पांढऱ्या कपड्यात वावरताना दिसतात तेंव्हा रंगाच्या या गुणवत्तेचा आपला भ्रमनिरास नक्की होतो.

पांढऱ्या रंगाच्या; स्वच्छता, शुचिता, पावित्र्य, निर्मल पारदर्शकता, सामंजस्य, व्यापकता, न्यायनिष्ठा, सत्वशीलाता, तारतम्यभाव आणि प्रवाहीपणा या सर्व गुणवत्तांचे एकच प्रतीक – चिह्न, आपल्या चतुर पूर्वजांनी आपल्याला दिले. विद्येची देवता देवी सरस्वतीचे शुभ्र पांढरे वस्त्र, तिचे शुभ्र कमलासन आणि तिच्या बाजूचा पांढरा हंस ही पांढऱ्या रंगाची पहिली प्रतीके. पांढरा रंग ज्या रंगांचे संतुलन ठेवतो त्या रंगांनी नटलेला बहुरंगी मोर हे याचे दुसरे प्रतीक. स्थैर्य आणि शांतता, दिलासा आणि आश्वासन, दुखः कमी करणारा आणि सांत्वनशील असा पांढरा रंग या विशेषणांनी संपन्न आहे. दक्षता, सुव्यवस्था आणि कार्यक्षमतेचे प्रतीक म्हणून समाजमनात स्वीकृत आहे. स्वत:च्या त्रुटी दूर करायला सहाय्य करणारा रंग आहे. आपले चित्त आणि वृत्ती म्हणजेच मन आणि बुद्धी स्थिर करून केंद्रित करणे हे अभ्यास आणि अन्य कुठलेही काम करण्यासाठी आवश्यक असते. पांढरा रंग या प्रक्रियेला सहाय्यक रंग आहे. रसिक नवरोबांनी आपल्या सौभाग्यवतीसाठी आणलेल्या पांढऱ्या

शुभ्र सुवासिक मोगऱ्याच्या गजऱ्याचा शृंगार करून नटलेली ललना, हे आपल्या भारतीय संस्कृतीतिल दांपत्य प्रेमाचे खास शृंगार लेणेच म्हणायला हवे.



< मोगऱ्याचा गजरा.

पाश्चिमात्य संस्कृतीनुसार निर्मलता आणि पवित्रता या गुणवत्तेमुळे लग्न समारंभात वधू नेहेमी पांढऱ्या रंगाचे परिधान करते. मात्र याच वेळी पाश्चात्य समाजमनात पांढरा रंग निष्क्रियता, रिक्तपणा, अर्थशुन्यता, एकटेपणा, नैराश्य, मृत्यू आणि दुखः या सर्व भावना – धारणांचा आणि निष्फलता, नापीकवृत्तीचा सूचक रंग आहे. दहाव्या – बाराव्या शतकांत युरोपात झालेल्या युद्धांत, पराभूत होणाऱ्या सैन्याचा सेनापती नेहेमी पांढरे निशाण ऊंच काठीवर लाऊन जेत्या सैन्याला पराभवाची कबुली देत असे. हे आहे पांढऱ्या रंगाचे एक नकारात्मक वैशिष्ट्य. आधुनिक युध्द प्रसंगी, पराभवाचे असे पांढरे निशाण आता सोशल मिडियामधे प्रसारित झालेल्या चित्र माध्यमातून सर्व जगाला दिसेल अश्या पद्धतीने झळकते. भारतीय हवाई दलाने, बालाकोटवर केलेल्या हवाई हल्ल्यानंतर, पराभूत देशाच्या पंतप्रधानांनी "नरो वा कुंजरोवा" शैलीमध्ये असेच पांढरे निशाण फडकावलेले सर्व जगाने पाहिलेच आहे. निशाण तेच, माध्यम बदलले इतकेच...!!..


< हिमाच्छादित पर्वत.

आपले निरागस बालपण आणि त्या आठवणी मनात उफाळून आल्या की शाळेच्या गणवेशातला पांढरा रंग, वही-पुस्तकाची पांढरी पाने डोळ्यासमोर येतात. डेंटिस्ट आणि डॉक्टरांच्या क्लिनिक मधल्या सर्व खोल्या नेहेमीच पांढऱ्या रंगाने रंगवलेल्या असतात. यामुळे पेशंटच्या मनात नकळत, स्वच्छता, शांतता अशा भावना निर्माण होतात. म्हणूनच डॉक्टरी पेशातील सर्वजण पांढऱ्या रंगाचा ऍप्रन वापरताना दिसतात. या पांढऱ्या ऍप्रनचे दुसरे वैशिष्ट्य असे की आपल्या दुखण्याचे - व्याधीचे निदान करताना डॉक्टरी पेशातले व्यावसायिक, आपल्याला खुश करण्यासाठी भावनिक विचार करत नाहीत तर वास्तव परिस्थितीचेच वर्णन करतात. या मांडणीनुसार पांढरा रंग, अनेकदा भावानाशून्येतेचे संकेत देतो. बर्फ अथवा हिम याचा रंग असल्याने हा रंग थंड प्रवृत्तीचा आहे. अनेकदा ही टोकाची प्रवृत्ती अति थंड म्हणजे भावानाशुन्यते कडेही जाते.

वस्तुनिष्ठ विचार करतांना हा रंग स्पष्टपण, शुद्धता, पावित्र्य आणि तारुण्य याचा संकेत देत असतो. व्यक्तीनिष्ठ धारणेत हा रंग उत्साहित करतो आणि संतुलित आरोग्य आणि मनःस्वास्थ्याचे निःशब्द प्रतीक असतो. पृथ्वीचा उपग्रह चंद्र, आठवड्यातील सोमवार आणि राशीचक्रातील कर्क राशी, या सर्वांचे हा प्रतीक – चिह्न आहे. एखादे उत्पादन वापरासाठी किती सुलभ आणि सुरक्षित आहे हे सांगण्यासाठी जाहिरातीत पांढरा रंग प्रामुख्याने वापरला जातो.

वजन कमी करण्यासाठी घ्यायचे एखादे औषध, कमी उष्मांक असलेले उत्पादन, दुग्धजन्य पदार्थ याच्या जाहिराती आणि वेष्टनावर अनेकदा पांढरा रंग प्रभावीपणे वापरलेला असतो.



^ सफेद झूट

या पांढऱ्या रंगाचे महत्वाचे वैशिष्ट्य आहे की याच्या मागे कोणी लपू शकत नाही कारण या रंगाची पारदर्शकता. आणि मग पांढरे शुभ्र कपडे घालून गैरव्यवहार करणाऱ्या मंडळींच्या फसव्या पांढऱ्या रंगाला ... **सफेद झूट** असे म्हटले जाते...!!..

**अंतिम लेखातून आपले रंगाष्टक, सफल संपूर्ण झाले आहे...!!**

--00--



< पांढरे वाघ

# रंग सुसंगती

सामान्यतः Harmony हा शब्द आपण स्वर आणि संगीत या संदर्भात, स्वरांची आणि वाद्यमेळाची अनुरूपता आणि स्वरैक्य याचे वर्णन करताना वापरतो. अगदी तसेच रंग सुसंगती, म्हणजे दोन अनुरूप रंगतत्वांचा मिलाप आणि त्यातून दृश्यस्वरूपांत निर्माण होणारा सुसंवाद हा माझ्या आवडीचा आणि अभ्यासाचा विषय कधी झाला ते सांगता येणार नाही. एखादे चित्र – एखादी देखणी इमारत – एखाद्या घराच्या आतील सजावट आणि नवरात्रीत तालबद्ध गरबा खेळणाऱ्या तरुणींची रंगीबेरंगी परिधाने अशा प्रत्येक दृश्यात आपल्याला या Color Harmony चा अनुभव मिळतो. या पुस्तकांतील **रंग सुसंगती** या शेवटच्या लेखांत, वाचकांना या ज्ञानशाखेचा विस्ताराने परिचय नक्की होईल.


आपल्याला सभोवतालचे रंग तसे का आणि कशामुळे दिसतात हे समजून घेण्यासाठी प्रथम आपल्या डोळ्यांच्या निसर्गदत्त दृष्टी क्षमतेचा परिचय करून घेऊया. खरे म्हणजे ही वर्णन केलेली क्रिया काही



शतांष सेकंदात घडत असते. आपल्या समोरच्या एखाद्या वस्तूवर जेंव्हा प्रकाश किरण पडतात तेंव्हा त्यातील जास्त किरण ती वस्तु शोषून घेते आणि काही प्रकाश किरण आपल्या डोळ्यात पहिल्या असलेल्या कॉर्नियावर (डोळयांच्या बाहुलीचा पारदर्शक पडदा) परावर्तित होतात. कॉर्निया हे किरण त्याच्या मागे असलेल्या प्यूपीलवर (बुबुळ-

डोळयांच्या बाहुलीचा गडद पडदा ज्याचा आकार लहान मोठा होतो) वक्रांकित करते. या किरणातला किती प्रकाश लेन्स (भिंग) पर्यन्त पाठवायचा त्याचे नियंत्रण हे प्यूपील करते. ही लेन्स, आपल्या डोळयाच्या सर्वात मागे असलेल्या रॅटीना (नेत्रपटल – दृष्टीपटल)  या नर्व्ह सेल वर हे प्रकाश किरण केंद्रित करते. त्या वस्तूवरून हे असे रॅटीना पर्यन्त परावर्तित झालेले प्रकाश किरण आपल्या मेंदूत पोहोचले की त्याचे विश्लेषण होऊन आपल्याला तो रंग समजतो.


इथे एक लक्षांत घ्यायला हवे की वस्तूवरून परावर्तित झालेले प्रकाश किरणच आपल्या डोळयांमार्फत मेंदूकडे पाठवले जातात. त्या वस्तूने शोषून घेतलेले प्रकाश किरण आपल्या डोळयांपर्यंत कधीही पोहोचत नाहीत. मानवी मेंदू RGB म्हणजे रेड – ग्रीन – ब्ल्यु या तीन




रंगांच्या १ कोटी ६० लाख पिक्सेलचे (टेलिव्हीजन - मोबाइल आणि कॉम्प्युटर पडद्यावर चित्र बनवणारे प्रकाशकण) विश्लेषण करून त्यातून एक कोटी वेगळे रंग ओळखतो. घारे अथवा निळे म्हणजे फिकट रंगाचे डोळे (बुबूळे) असलेल्या व्यक्तींच्या डोळयात पिगमेंटेशन म्हणजे रंगद्रव्यांचा थोडासा अभाव असतो. त्यामुळे अशा व्यक्ति प्रकाशाबद्दल खूप संवेदनशील असतात. आपण लाल रंगाकडे तीस सेकंद आणि त्यापेक्षा जास्त काळ पाहिले की लाल रंग

ओळखणाऱ्या पेशींची क्षमता कमी होते आणि आपल्या डोळ्यातला रॅटीना थकून जातो. अशावेळी आपण जर पांढऱ्या रंगाकडे पाहिले तर मेंदूतिल रंगसंवेदनशील पेशी, लाल रंगाचा प्रभाव पुसून टाकतात आणि आपल्याला हिरवा रंग दिसू लागतो. ही सर्व क्रिया निसर्गत: होत असते.

कुठलाही रंग ओळखण्यासाठी, सामान्य दृष्टी क्षमता असलेल्या व्यक्तीला, तो रंग – आपले डोळे आणि आपल्या मेंदूतील रंगसंवेदनशील पेशी यांची सुसंगती असणे आवश्यक असते. काही व्यक्तिमधे रंगसंवेदनशील पेशींची क्षमता निसर्गत: कमी असते. यालाच रंगांधळेपणा किंवा Color Blindness असे संबोधित केले जाते. अशा व्यक्तींना लाल आणि हिरवा रंग सामान्य माणसाला दिसतो तसा दिसत नाही. या दोन रंगातिल फरक न समजणे हे याचे प्रमुख लक्षण असते. खालील चित्रातील वरच्या दोन सफरचंदांचे रंग सामान्य दृष्टीला दिसतात तसे आहेत. रंगांधळ्या व्यक्तीला तीच दोन सफरचंद खालच्या चित्रातील रंगाची दिसतात. (चित्र क्र १).



< चित्र क्र १

रंगीत कागदावर छापलेले मजकुर आणि चित्र आपण बराच वेळ पहात आणि वाचत राहिलो तर आपल्या मेंदूतील रंगसंवेदनशील पेशी थकून जातात. अशा वेळी आपण त्या पुस्तकावरची नजर दुसऱ्या ठिकाणी फिरवली तर आपल्या डोळ्यासमोर तीच चित्र बरोब्बर उलट्या रंगात दिसतात. चार-पांच वर्षांच्या लहान मुलांना आपण बऱ्याचदा त्यांना आवडतील अशी मोठ्या आकर्षक रंगीत चित्रांची पुस्तके वाचायला देतो. दोन-तीन मिनिटांतच मुलं पुस्तक वाचायचे सोडून इतर खेळ खेळायला लागतात. अशा वेळी सुजाण पालकांना, मुलाचे लक्ष पुस्तकावर केंद्रित न होण्याचे निश्चित कारण माहीत असायला हवे.

लाल आणि हिरवा या रंगांना ओळखण्यासाठी आपल्या मेंदूतील रंगसंवेदनशील पेशींची फार मोठी शक्ति खर्च होत नाही. निळा रंग ओळखण्यासाठी मात्र या पेशींची जास्त शक्ति खर्च होते. त्यामुळे लाल – हिरवा – यलोग्रीन हे तीन रंग आपल्याला खूप दुरूनही दिसतात. रंगांच्या संशोधनाने आता सिद्ध झाले आहे की रंग आपल्यावर, आपल्या निर्णयांवर आणि व्यक्तिमत्वावर, आपल्या नकळत खूप प्रभाव टाकत असतात. लाल – काळा – ब्राऊन – कॉपर – ब्रॉन्झ हे रंग आणि रंग छटा वापरणाऱ्या व्यक्ति शृंगारप्रवीण असतात आणि अशा आकर्षणामुळे पहाणाऱ्याचे लक्ष वेधून घेतात. लाल – भगवा – काळा – रॉयल ब्ल्यु हे रंग आणि रंग छटा, ग्राहकाला आवेगी (impulsive) खरेदी करायला भाग पाडतात. याउलट, पिंक – लाईट ग्रीन –

लाईट ब्ल्यु – नेव्ही ब्ल्यु या रंग छटा असलेल्या वस्तु अथवा कपडे, काटकसरीने खर्च करणाऱ्या ग्राहकाला आकर्षित करतात.

आपल्या सर्वांना सगळे रंग ओळखता येतात हे खरे. मात्र मानवी मेंदूत तीन वेगळ्या प्रकारचे फोटोरिसेप्टर्स म्हणजेच रंगसंवेदनशील पेशी असतात. आपल्या प्रत्येकाला यातल्या एकाच प्रकारच्या पेशी निसर्गत: मिळालेल्या असतात. मात्र या तिन्ही पेशी वेगळ्या असल्या तरी त्या लाल – हिरवा – निळा हे तीन रंग आणि यांच्या असंख्य छटा ओळखतात. निळा – लाल – हिरवा – नारिंगी – यलोग्रीन हे पांच रंग कुठल्याही माध्यमात दिसले तरी आपले लक्ष वेधून घेतात. मात्र या सर्व रंगांची योग्य पार्श्वभूमी यावर त्यांचे यश अवलंबून असते. अनुभवी चित्रकार – छायाचित्रकार – सिनेमाटोग्राफर – नाटकांचे नेपथ्यकार – नाट्य दिग्दर्शक – इंटीरियर डिझायनर आणि कसबी जाहिरात तज्ज्ञ हे सर्वच या रंगांसाठी नेहेमी विपरीत किंवा भिन्न अथवा Contrast पार्श्वभूमीची योजना करतात. अशी योजना Complementary रंगांची असते किंवा Analogous रंगांची असते. (चित्र क्र ४ आणि क्र ५) माणसांचे कपडे – घराची पार्श्वभूमी – वाहनांचे रंग – परिसरातील निसर्ग आणि शेवटी योग्य प्रकाशयोजना यामुळे मुख्य रंगांना आवश्यक तो उठाव आणि महत्व मिळते आणि ते लक्ष वेधून घेतात. मात्र या विपरीत किंवा भिन्न अथवा Contrast  या सर्व संबोधनांना आपण **रंग सुसंगत** असे म्हणूया. नेमके हेच या लेखाचे शीर्षक आहे.

Color Harmony – रंग सुसंगती – रंग सुसंवाद – अनुरूप रंग – रंग मिलाप या सर्व समानार्थी संज्ञा आहेत. असा डोळ्यांना सुखद वाटणारा, आकर्षक दृश्य अनुभव, आपल्याला अनेक माध्यमात मिळतो. ब्लॅक अँड व्हाईट चित्रपट आणि छायाचित्र असो, वास्तव अथवा अमूर्त शैलीतली चित्रकला असो, सादर होणारे नाटक असो, टेलिव्हिजन वरची मालिका असो अथवा आपल्या हातातल्या मोबाइल हँडसेटच्या छोट्याशा पडद्यावर आणि कॉम्प्युटर च्या पडद्यावर रोज येणाऱ्या इमेज असोत.. ..या सर्व आणि अर्थात प्रत्येक माध्यमात आपल्याला आकर्षक दृश्य अनुभव नेहेमीच मिळत असतो. या अनुभवाला सुखद बनवण्याचे काम रंग सुसंगतीचे असते.



^ चित्र क्र २




^ चित्र क्र ३


रंग सुसंगतीचे कोणालाही पटकन समजणारे आणि त्यातला रंगार्थ उमगणाऱ्या या पाहिल्या चित्र क्र २ मधे, सर्वांना आकर्षित करणाऱ्या लाल रंगाच्या या चार वेगळ्या पार्श्वभूमी दिसतात. कुठल्या पार्श्वभूमीवर लाल रंग उठून दिसतो आहे त्याचे वर्णन करायची आवश्यकता नाही कारण हे वाचणारे वाचक चतुर आहेत.

चित्र क्र ३, थोडा वेगळा रंगार्थ व्यक्त करते आहे. इथे निळ्या आणि जांभळ्या रंगाच्या दोन पार्श्वभूमीवर त्याच दोन रंगांचे छोटे आयत जागा बदलून

अंकित केले आहेत. कुठल्याही रंगाला योग्य उठाव मिळण्यासाठी त्याची पार्श्वभूमी किती महत्वाची आहे याची सहज जाणीव देणारी ही दोन चित्र. थोडक्यात सांगायचे तर गणेशोत्सवात आपला गणपतीबाप्पा घरी यायच्या आधी आपण त्याच्या भोवतालच्या मखराची मांडणी आणि सजावट खूप मन लाऊन करतो. या रंगांच्या पार्श्वभूमीचेही तसेच काहीसे महत्व...!



**^ चित्र क्र ४ Complementary Colors पूरक रंग सुसंगती**




^ चित्र क्र ५ Analogous Colors सदृश रंग सुसंगती

चित्र क्रमांक ४ मधे **Complementary Colors पूरक रंग सुसंगती मधे रंगचक्रातील विरोधी रंग दिसतात.** चित्र क्रमांक ५ मधे **Analogous**

**Colors सदृश रंग सुसंगती मधे रंगचक्रातील शेजारी रंगांची गंमत दिसते. या निसर्गात आढळणाऱ्या दोन भिन्न प्रकारच्या रंगसंगती आपल्याला रंग सुसंगतीचा सुखद दृष्टी अनुभव देतात. Color Harmony अर्थात रंग सुसंगतीचा असा सुखद अनुभव आपण डोळे उघडल्यावर प्रत्येक क्षणी मिळत रहातो.**

**--००—**



## श्री. अरुण फडके यांची ई साहित्यवरील पुस्तके

## कव्हरवर क्लिक करताच ते ते पुस्तक उघडेल.



# ई साहित्य प्रतिष्ठानचे हे चौदावे वर्ष.
# श्री. अरुण फडके यांचे ई साहित्यवर हे सहावे पुस्तक.

श्री. अरूण फडके हे एक अनेक पैलू असलेले लेखक, कलाकार, सामाजिक कार्यकर्ते आहेत. चिन्हे व प्राचीन भारतीय संस्कृती हा त्यांच्या सखोल अभ्यासाचा विषय. मराठी भाषेचे सौंदर्य वाढवणाऱ्या म्हणी, पुरातन इमारतींचे संवर्धन, भव्य कार्यक्रमांचे सौंदर्यशास्त्रीय आयोजन असे त्यांचे अभ्यासाचे विषय आहेत आणि या प्रत्येक विषयाच्या मुळापर्यंत जाण्याची वृत्ती व अचुक आणि नेमके लिहीण्यासाठी कष्ट घेण्याची तयारी यामुळे त्यांना साहित्यिक वर्तुळांत मानाचे स्थान आहे. सध्याच्या whatsapp युनिव्हर्सिटीच्या काळात त्यांचे मौलिक लेखन ही एक मोठीच बौद्धिक मेजवानी असते.

श्री. अरूण फडके यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपले पुस्तक ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर ई साहित्यवर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले (९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१२), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(८), डॉ. नितीन मोरे (३४), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(१२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (५० खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक

कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १७ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(२६), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (११), अंकुश शिंगाडे(१७), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(६) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(८), जगदिश खांदेवाले(५) पंकज कोटलवार(४) डॉ. सुरुची नाईक (३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(४), श्याम कुलकर्णी(२), किशोर कुलकर्णी, रामदास खरे(४), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर,असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

**आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं ’इ’यें।**

**दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।**